रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक २१
www.ramprahar.com

सोमवार, ७ ऑगस्ट २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग


मुरुडमधील मोठ्या बोटी मासेमारीसाठी रवाना/२

माडभुवन आदिवासीवाडी पुन्हा गजबजली/६

सुवर्णपदक विजेत्या आदिती स्वामीचे सर्वत्र कौतुक/८


## पुण्यातील दहशतवाद्यांकडून बॉम्बचे साहित्य जप्त



**पुणे** : पुण्यात कोथरूड येथून अटक करण्यात आलेल्या दोन दहशतवाद्यांच्या चौकशीत अनेक धक्कादायक सत्य उघडकीस आले आहे. दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) त्यांच्या घरातून बॉम्ब तयार करण्याचे साहित्य, पांढऱ्या रंगाची पावडर जप्त केली आहे. विशेष म्हणजे आरोपींनी कोंढवा येथील घरातच प्रयोगशाळा सुरू केली असल्याची माहिती तपसात उघड झाली आहे. पुणे पोलिसांनी या दोन दहशतवाद्यांना अटक केली होती. त्यांनी पुणे, सातारा, कोल्हापूरच्या जंगलात बॉम्बस्फोट घडविण्याची चाचणी केल्याचेदेखील उघड झाले आहे. त्यांच्या कोंढव्यातील मिठानगर भागात असलेल्या घरात एटीएसच्या पथकाने पुन्हा झडती घेतली असता बॉम्ब तयार करण्याचे साहित्य सापडले. ते जप्त करण्यात आले असून अधिक तपास सुरू आहे.

# विकसित देशाच्या ध्येयाकडे वाटचाल

## पंतप्रधान मोदींचे प्रतिपादन; ५०८ रेल्वेस्थानकांच्या पुनर्विकासाची पायाभरणी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (दि. ६) देशातील ५०८ रेल्वेस्थानकांच्या पुनर्विकास कामांची पायाभरणी केली. या वेळी पंतप्रधान मोदी म्हणाले की, विकासित देशाच्या ध्येयाकडे आपला देश वेगाने वाटचाल करत आहे. भारतीय रेल्वेच्या इतिहासातही एक नवा अध्याय आजपासून सुरू होत आहे. भारतातील सुमारे १३०० प्रमुख रेल्वेस्थानके आता अमृत भारत रेल्वेस्थानके म्हणून विकसित केली जातील.

रेल्वे मंत्रालयाने देशातील एक हजार ३०० रेल्वेस्थानकांचा कायापालट करण्याचा निर्णय घेतला आहे. अमृत भारत स्टेशन योजनेतंर्गत टप्प्याटप्प्याने देशातील रेल्वेस्थानकांचा पुनर्विकास केला जाणार आहे. या अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी दूरदृष्यप्रणालीद्वारे देशातील ५०८ रेल्वेस्थानकांच्या पुनर्विकासाची पायाभरणी केली. या सोहळ्यास त्यांच्यासमवेत रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव उपस्थित होते.

या वेळी पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज संपूर्ण जगाचे लक्ष भारतावर आहे. जागतिक स्तरावर भारताला फार सन्मान आहे. भारत विकसित होण्याच्या दिशेने पावले टाकत आहे. हा अमृतकाळाचा प्रारंभ आहे. नवीन ऊर्जा आपल्यासोबत आहे. नवीन प्रेरणेने आपण काम करीत आहोत. नवीन संकल्प आपण सोडले आहे. आज भारतीय रेल्वेच्या इतिहासामध्येही एक नवा अध्याय लिहिला गेला आहे.

### विरोधकांकडून चांगल्या कामास होतोय विरोध

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या वेळी विरोधी पक्षांवर निशाणा साधला. विरोधी पक्ष चांगल्या कामाचा विरोध करतात. विरोधकांनी संसदेच्या नव्या इमारतीचा विरोध केला. शहिदांसाठी वॉर मेमोरिएलही त्यांनी उभारले नाहीत. विरोधी पक्ष स्टॅच्यू ऑफ युनिटीमध्ये गेले नाहीत. त्यांनी सरदार पटेल यांना वंदन केले नाही. ते स्वतः काही करणार नाहीत आणि करूही देणार नाहीत, पण आमचे सरकार हे सकारात्मकतेवर लक्ष केंद्रित करीत आहे. विरोधकांच्या क्षुल्लक राजकारणापेक्षा आम्ही विकासाला प्राधान्य देतो, असे पंतप्रधान म्हणाले.

# पनवेलमधील सुकापूर परिसरात विकासाची गंगा

## विविध विधायक कामांचे उद्‌घाटन आणि भूमिपूजन | आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शुभारंभ



(अधिक छायाचित्रे पान ३ वर..)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलजवळील पाली देवद (सुकापूर) ग्रामपंचायत हद्दीत विविध विकासकामांचे उद्‌घाटन व भूमिपूजन कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांच्यासह इतर मान्यवरांच्या हस्ते रविवारी (दि. ६) करण्यात आले. सुकापूरमधील नागरिकांना वाढदिवसाची ही अनोखी भेट आहे.

या कार्यक्रमांना भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय पाटील, माजी जि.प. सदस्य अमित जाधव, माजी पं.स.सदस्य भूपेंद्र पाटील, **(पान २ वर..)**

## महाराष्ट्रातील प्रत्येक साखर कारखान्यात इथेनॉलची निर्मिती व्हायला हवी –ना. शाह




**पुणे : प्रतिनिधी**

दोन दिवसांच्या पुणे दौऱ्यावर असलेले केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते सहकार संस्था निबंधक कार्यालयाच्या डिजिटल पोर्टलचे उद्घाटन रविवारी (दि. ६) करण्यात आले. या वेळी बोलताना त्यांनी महाराष्ट्रातील प्रत्येक साखर कारखान्यात इथेनॉलची निर्मिती व्हायला हवी. याबाबत राज्य सरकारने पावले उचलावीत, असे म्हटले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सहकारातून समृद्धी या संकल्पनेतून सहकार मंत्रालयाने देशातील सहकार चळवळ बळकट करण्यासाठी अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. डिजिटल पोर्टल हा त्याचाच एक भाग आहे. पिंपरी चिंचवडच्या रामकृष्ण मोरे प्रेक्षकगृहात झालेल्या या समारंभास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील, पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह प्रमुख नेते, अधिकारी उपस्थित होते. **(पान २ वर..)**

## कामोठ्यातील युवा कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथील असंख्य युवा कार्यकर्त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी (दि. ६) भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. या सर्वांचे स्वागत करण्यात आले.

भाजपच्या पनवेल तालुका व शहर कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमास उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप भगत, माजी नगरसेविका अरुणा भगत, युवा मोर्चा कामोठे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, एस. के. भगत, स्वाती किंद्रे, मनोहर शिंगाडे, सचिन यमगर, सुयोग वाफारे, शैलेश परबळकर आदी उपस्थित होते. **(पान २ वर..)**

## अभीष्टचिंतन!

**पनवेल : जाणीव एक सामाजिक संस्थेतर्फे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त गीत रामायण कार्यक्रमाचे आयोजन शनिवारी फडके नाट्यगृहात करण्यात आले होते. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांचे अभीष्टचिंतन करताना वडील माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आई शकुंतला ठाकूर यांच्यासह भाजप ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, संस्थेचे संस्थापक माजी नगरसेवक नितीन पाटील आदी उपस्थित होते.** **(वृत्त पान ३ वर..)**








NEW JAI BHARAT SHIKSHAN PRASARAK MANDAL'S

SHANTINIKETAN POLYTECHNIC

DTE Code : 3422 | NEW PANVEL | MSBTE Code : 1509

Plot No. 27, Sector-2, Navi Mumbai, Raigad - 410 206

**Email :** njbspmp@gmail.com **Website :** www.shantiniketanpolytechnic.com

Approved by AICTE & DTE, Affiliated to MSBTE

शांतिनिकेतन डिप्लोमा इंजिनिअरींग कॉलेज

प्रवेश सुरू | प्रवेश पात्रता : 10 वी पास | प्रवेश सुरू

ठळक वैशिष्ट्ये

- पनवेल रेल्वे स्टेशन आणि बस स्टॅन्डपासून चालत जाण्याच्या अंतरावर
  Institute is at walkable distance from Panvel Railway Station & Panvel Bus Stand
- सर्व सोयीयुक्त/आकर्षक इमारत
  Attractive Infrastructure will all Amenities
- सर्वांगिन समतोल विकास साधण्यासाठी ज्ञान-कौशल्य-संस्कार यावर भर
  All Rounder Teaching Learning-Knowledge-Skill & Behavior
- मराठी-इंग्रजीमधून अभ्यासक्रम व परीक्षा
  Marathi-English Syllabus & Examination
- इंटरनेट आणि वाय-फाय सुविधा
  Internet & Wi-Fi Facilities
- प्रात्यक्षिक व इंडस्ट्रीयल ट्रेनिंगवर भर
  Practical & Industrial Training



प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे (Document)

| अ.क्र. | कागदपत्रे | Document | Open | SBC/OBC/ VJNT | SC/ST |
|---|---|---|---|---|---|
| 1 | १० वी ची मार्कशीट | S.S.C Marksheet and Certificate | ✓ | ✓ | ✓ |
| 2 | शाळा सोडलेचा दाखला | Leaving Certificate | ✓ | ✓ | ✓ |
| 3 | नॅशनॅलिटी / डोमेसाईल | Domicile / Nationality Certificate | ✓ | ✓ | ✓ |
| 4 | उत्पन्नाचा दाखला | Income Certificate. | – | ✓ | ✓ |
| 5 | जात प्रमाणत्र | Cast Certificate | – | ✓ | ✓ |
| 6 | नॉन क्रेमिलिअर | Non Creamy layer certificate | – | ✓ | – |
| 7 | बँक पासबुक | Bank Passsbook | ✓ | ✓ | ✓ |
| 8 | आधार कार्ड झेरॉक्स | Aadhar Card | ✓ | ✓ | ✓ |
| 9 | ३ कलर फोटो | Passport size photo - 3 | ✓ | ✓ | ✓ |

COURSES Detail for Academic Year 2023-24

AICTE Approved Post S.S.C. Diploma in Engineering (Polytechnic)

| Course Name | Choice Code | Intake |
|---|---|---|
| Civil Engineering | 342219110 | 45 |
| Computer Engg. | 342224510 | 45 |
| Mechanical Engineering | 342261210 | 45 |

**Prof. R. G. Patil**
Principal

सर्व पात्र विद्यार्थ्यांना फी मध्ये शासकीय सवलत मिळणार

**Prof. R. K. Khalane**
Vice - Principal

Prof. Sushant Sathe (Civil) **9822839891** | Prof. Gitanjali Sanas (Comp.) **8796492413** | Prof. Rohidas Chaudhari (Mech.) **9309883148**

# मुंबईकरांसाठी खासगी वाहतूक सेवा सुरू

## बेस्टच्या संपामुळे राज्य सरकारचा निर्णय



**मुंबई : प्रतिनिधी**

बेस्ट परिवहन सेवेतील कंत्राटदारांच्या अखत्यारीत असलेल्या कंत्राटी चालकांनी विविध मागण्यांसाठी पुकारलेल्या संपाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. या संपामुळे सर्वसामान्य जनतेची गैरसोय होऊ नये, यासाठी खासगी वाहनांतून टप्पा प्रवासी वाहतूक करण्यास सरकारने मंजुरी दिली आहे. संप सुरू असेपर्यंत हे आदेश लागू असणार आहे. या निर्णयाबाबत सरकारने अधिसूचना जारी केली आहे.

बेस्टचा संप सुरू असल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत. ही बाब लक्षात घेता मुंबई महानगर परिक्षेत्रातील सर्व प्रकारच्या सार्वजनिक सेवा वाहनांतून यामध्ये सर्व प्रकारच्या रिक्षा, टॅक्सी, खासगी बसेस, स्कूल बसेस आदींमधून प्रवाशांच्या वाहतुकीस संप संपेपर्यंतच्या कालावधीसाठी टप्पा वाहतूक करण्यास परवानगी देण्यात येत आली आहे.

मोटार वाहन अधिनियमानुसार, मुंबई महानगर परिक्षेत्रातील सर्व प्रकारच्या सार्वजनिक सेवा वाहनांतून (पीएसव्ही सर्व प्रकारच्या रिक्षा, टॅक्सी, खासगी बसेस, स्कूल बसेस) आदींमधून प्रवाशांच्या वाहतूकीस संप संपेपर्यंतच्या कालावधीसाठी टप्पा वाहतूक करण्यास शासनाने परवानगी दिली आहे. संप मागे घेतल्यास ही अधिसूचना रद्द समजण्यात यावी, असे गृह (परिवहन) विभागाने आपल्या आदेशात स्पष्ट केले आहे.

बेस्टच्या मदतीसाठी रविवारी सायंकाळी ४ वाजेपर्यंत १०४ एसटी बसेस विविध मार्गांवर चालवण्यात आल्या आहेत. एसटी महामंडळाकडून जवळपास १५० बसेस बेस्टच्या मदतीला दिल्या आहेत.

### बेस्ट प्रशासनाकडून कंत्राटदारांसोबत चर्चा

*कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे बेस्टची प्रवासी वाहतूक विस्कळीत झाली आहे. बेस्ट प्रशासनाने रविवारी (दि. ६) सर्व बस पुरवठादार व्यवसाय संस्था मालकांसोबत बैठक घेतली. या बैठकीत प्रशासनाने काम बंद आंदोलनाबाबत त्वरित तोडगा काढण्याचे निर्देश दिले आहे. बेस्टकडून कंत्राटदारांना संपातील प्रतिबस मागे ५००० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.*

# अमृत भारत योजनेंतर्गत महाराष्ट्रातील रेल्वेस्थानकांच्या परिवर्तनाचा शुभारंभ

**मुंबई : प्रतिनिधी**

अमृत भारत स्थानके पुनर्विकास योजनेचा रविवारी (दि. ६) देशव्यापी शुभारंभ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आभासी पद्धतीने झाला. या वेळी त्यांनी देशातील ५०८ रेल्वेस्थानकांच्या पुनर्विकासाची पायाभरणी केली. याचाच भाग म्हणून मुंबईत परळ स्थानकात झालेल्या कार्यक्रमात राज्यपाल रमेश बैस सहभागी झाले होते. या वेळी त्यांनी महाराष्ट्राच्या विकासात रेल्वेचे योगदान अधोरेखित केले.

अमृत भारत स्थानके पुनर्विकास योजनेंतर्गत महाराष्ट्रातील ४४ रेल्वेस्थानकांचा पुनर्विकास करून ती अत्याधुनिक केली जाणार असून यात प्रवाशांना जागतिक दर्जाच्या सोयीसुविधा देण्यावर भर दिला जाणार आहे. या संदर्भात बोलताना राज्यपाल बैस यांनी राज्यातील पायाभूत सुविधा उभारणीला बळ देण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कटिबद्धतेबद्दल, कृतज्ञता व्यक्त केली. देशात रेल्वे सुरू झाल्यापासून आजपर्यंत रेल्वे विभागाने दिलेल्या सेवेचा आणि अविरत प्रगतीचा राज्यपालांनी उल्लेख केला, तसेच प्रवासी आणि मालवाहतुकीच्या क्षेत्रात, रेल्वेचा प्रभावही त्यांनी अधोरेखित केला. रेल्वे प्रवास आज आरामदायी झाला असल्याबद्दल आनंद व्यक्त करीत आपल्याला स्वतःला रेल्वेने प्रवास करायला आवडते, असेही राज्यपालांनी सांगितले. भारतीय रेल्वेला देशाची जीवनवाहिनी असे म्हटले जाते, हा संदर्भ देत रेल्वे, भारताच्या विविधतेतील एकतेचे प्रतीक असून देशाच्या विविध भागांना ती एकत्र आणते, असे राज्यपाल म्हणाले. महाराष्ट्राचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यासह इतर प्रमुख मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते.

रेल्वेस्थानकांचे आधुनिकीकरण करण्याचे महत्त्व अधोरेखित करताना, राज्यपाल म्हणाले की, हे दीर्घ काळापासून प्रलंबित होते. आता आधुनिक सुविधांयुक्त स्थानके, ग्रामीण विकासाला गती देतील आणि मुंबईसारख्या शहरासाठीदेखील प्रवास सुखकर होण्यात मदत होईल. याशिवाय रेल्वेशी संबंधित ट्रान्स हार्बर लिंक, मुंबई मेट्रो प्रकल्प आणि किनारी मार्ग प्रकल्प अशा सर्व पायाभूत प्रकल्पांमुळे मुंबईचा कायापालट होणार असून हे एक जागतिक दर्जाचे शहर बनेल, असेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रीनितीन गडकरी आणि केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी अनुक्रमे नागपूर आणि जालना रेल्वेस्थानकावर कार्यक्रमांना उपस्थित राहून संबोधित केले. त्याच वेळी आकुर्डी आणि पुणे रेल्वेस्थानकावर आयोजित कार्यक्रमात राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित होते. महाराष्ट्रातील ४४ रेल्वेस्थानकांवर आयोजित कार्यक्रमांना स्थानिक खासदार, आमदार, स्वातंत्र्यसैनिक आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

### योजनेत समाविष्ट राज्यातील स्थानके

**मुंबई रेल्वे विभाग-कांजुरमार्ग, परळ, विक्रोळी; सोलापूर विभाग-अहमदनगर, दौंड, कोपरगाव, कुर्डुवाडी जंक्शन, लातूर, उस्मानाबाद, पंढरपूर, सोलापूर; पुणे विभाग-आकुर्डी, कोल्हापूर, तळेगाव; भुसावळ विभाग-बडनेरा, मलकापूर, चाळीसगाव, मनमाड, शेगाव; नागपूर विभाग-वडसा, गोंदिया, चांदाफोर्ट, बल्लारशाह, चंद्रपूर, धामणगाव, गोधनी, हिंगणघाट, काटोल, सेवाग्राम, नरखेड, पुलगाव; नांदेड विभाग-औरंगाबाद, गंगाखेड, हिंगोली डेकन, जालना, किनवट, मुदखेड, नगरसोल, परभणी, परतूर, पूर्णा, सेलू, वाशिम; सिकंदराबाद विभाग-परळी वैजनाथ.**

# सराईत आरोपींकडून १२ गुन्ह्यांची उकल

## सुमारे १२ लाखांचा मुद्देमाल केला हस्तगत



**पनवेल : वार्ताहर**

कक्ष ३ गुन्हे शाखेकडून घरफोडी व जबरी चोरीच्या गुन्ह्यातील दोन आरोपींना अटक केल्याने त्यांच्याकडून १२ गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे. जवळपास १२ लाख १६ हजार ४२१ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत बेलापूर पोलीस ठाणे हद्दीमध्ये अज्ञात चोरट्यांनी रोख रक्कम, सोन्या-चांदीचे दागिने, मोबाईल फोन व इतर वस्तू असा एकूण सात लाख ५० हजार रू. किमतीचा मुद्देमाल चोरल्याबाबत तक्रार बेलापूर पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. पोलिसांच्या पथकाने गुन्ह्याचे घटनास्थळावरील सीसीटीव्ही कॅमेरे तपासून तसेच बातमीदाराकडून प्राप्त माहिती व तांत्रिक तपास या आधारे आरोपी हैदर अनारुल शेख (कळवा, ठाणे) व युसुफ नुर इस्लाम शेख (वय २६, मुंब्रा, ठाणे) यांचा सहभाग निष्पन्न झाला. आरोपी गुन्हा केल्यानंतर त्यांचे मुळ गावी मुर्शिदाबाद, पश्चिम बंगाल या ठिकाणी रेल्वेने पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना त्यांना वर्धा रेल्वेस्टेशन येथे गितांजली एक्सप्रेसमधून ताब्यात घेण्यात आले.

दोन्ही आरोपींना दाखल गुन्हयात अटक करून त्यांच्याकडे केलेल्या तपासात एकूण १२ गुन्हे उघडकीस आले. त्यामध्ये पनवेल शहर, सीबीडी, कळवा, ठाणे लोहमार्ग, कोपरखैरणे, एनआरआय, सानपाडा, रबाळे आदी परिसरातील गुन्हे उघडकीस आले आाहेत व त्यांच्याकडून जवळपास १२ लाख १६ हजार ४२१ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

## नवी मुंबईत उद्या पाणीपुरवठा बंद

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेमार्फत मंगळवारी (दि. ८) मुख्य जलवाहिनी दुरुस्ती करण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. यासाठी मंगळवारी पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील बेलापूर, नेरुळ, वाशी, तुर्भे, सानपाडा, कोपरखैरणे, घणसोली व ऐरोली या विभागात मंगळवारी संध्याकाळी पाणीपुरवठा होणार नाही, तसेच थेट नळ जोडण्यांचा व सिडको क्षेत्रातील कामोठे नोडमधील पाणीपुरवठादेखील बंद राहील. बुधवारी (दि. ९) कमी दाबाने पाणीपुरवठा होईल. पाण्याचा जपून वापर करावा, असे आवाहन महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.

राम प्रहर
वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा

# रत्नागिरी येथे महाप्रित व कोकण रेल्वे उभारणार कोल्ड स्टोरेज

**मुंबई : प्रतिनिधी**

महात्मा फुले नवीनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित) व कोकण रेल्वे कार्पोरेशन लिमिटेड यांच्यामध्ये रत्नागिरी येथे कोल्ड स्टोरेज उभारण्याबाबत नुकताच करार करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने कोकण रेल्वे कार्पोरेशनच्या पुढाकाराने रत्नागिरी रेल्वे विभागीय कार्यालयाच्या सभागृहात व्यावसायिक बैठकीचे आयोजन करण्यात आले.

या बैठकीला कोकण रेल्वे कार्पोरेशनचे संचालक (संचलन व कमर्शियल) संतोषकुमार झा, मुख्य व्यवस्थापक एल. के. वर्मा, भारतीय कंन्टेनर कार्पोरेशन लिमिटेडचे अरूंजय कुमार सिंह, महाप्रित कंपनीचे महाव्यवस्थापक तेजस शिंदे, महात्मा फुले महामंडळाचे रत्नागिरीचे जिल्हा व्यवस्थापक के. व्ही. लोहकरे यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी कोकण रेल्वेचे संचालक संतोषकुमार झा म्हणाले, या व्यावसायिक बैठकीचा मुख्य उद्देश व्यवसाय मालकाच्या गरजा समजून घेणे व कोल्ड स्टोरेज चेन (शीतगृह साखळी) उभारणे, मालवाहतूक व लॉजिस्टिकचा विस्तार करून निर्यात वाढविणे आहे, तसेच रत्नागिरीच्या या कोल्ड स्टोरेजपासून जेएनपीटीपर्यंत रेल्वेद्वारे यापूर्वीच वाहतूक सुरू करण्यात आली आहे. या वेळी महाप्रितचे तेजस शिंदे यांनी महाप्रितच्या कोल्ड स्टोरेज प्रकल्पाची माहिती उपस्थितांना विषद केली, तसेच या कोल्ड स्टोरेज प्रकल्पामुळे कोकण विभागातील शेतकरी बांधवांना व व्यावसायिकांना मोठ्या प्रमाणात लाभ मिळणार आहे.

कोकण रेल्वेचे संचालक संतोषकुमार झा यांनी महाप्रितच्या कार्याची प्रशंसा केली. भविष्यात मोठ्या क्षमतेच्या कोल्ड स्टोरेज उभारण्याची सूचना केली. या बैठकीला कोकण विभागातील व्यावसायिकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवून या योजनेला उत्कृष्ट प्रतिसाद दिला.



# खारघरच्या रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये आधुनिक अध्यापन पद्धतीवर कार्यक्रम





**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात कार्यशाळा व चर्चासत्र समितीतर्फे आधुनिक अध्यापन पद्धती या विषयावर अभिमुखता कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमासाठी वेगवेगळ्या महाविद्यालयातील प्राध्यापक व प्रशिक्षक उपस्थित होते.

शनिवारी एका सत्राचे आयोजन केले होते. या सत्रासाठी प्रमुख व्यक्ते म्हणून डॉ. मोहम्मद अन्सारी यांनी (एसआयईएस महाविद्यालय सायन) अध्ययन व अध्यापन पद्धतीमध्ये माहिती व तंत्रज्ञानाचा वापर कशा पद्धतीने करायचा याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. रविवारी तीन सत्रांचे आयोजन केले होते. भूषण भालचंद्र कुलकर्णी (प्रशिक्षक, नॉलेज ब्रिज संस्था अहमदनगर) यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करून डिजिटल लेसन प्लॅन कसे बनवायचे याविषयी मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. राजू तलरेजा व प्रा. डॉ. नीलू वर्मा यांनी शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची शिकण्यासाठी असणारी प्रतिबद्धता मार्गदर्शन केले.

या शैक्षणिक उपक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रुपेंद्र गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयातील कार्यशाळा व चर्चासत्र समितीचे समन्वयक प्रा. डॉ. फारुख शेख व इतर सर्व सदस्यांनी मेहनत घेतली.

# मुरूडमधील मोठ्या बोटी मासेमारीसाठी झाल्या रवाना



**मुरुड : प्रतिनिधी**

नारळी पौर्णिमेला सागराला नारळ अर्पण करून बोटी समुद्रात उतरून मासेमारीचा हंगाम सुरू होतो, परंतु यंदा श्रावण महिना अधिक आल्याने मासेमारीचा हंगाम लगेच सुरू होत आहे. कोळीवाड्यांमध्ये सध्या मच्छीमारी बोटी समुद्रात उतरवण्याची लगबग वेगाने सुरू आहे.

बोटी समुद्रात उतरवण्यापूर्वी बोटीला लावण्यात येणारे पारंपरिक करंजाचे तेल आणि रंगरंगोटी करण्याचे काम गेल्या १५ दिवसांपासून बंदरात सुरू आहे. मासळी पकडण्याच्या जाळ्यांची दुरुस्ती, नवीन जाळ्यांची खरेदी याबरोबर दोरांची मजबुती तपासणी आणि आवश्यक ती कामे आता अखेरच्या टप्प्यात आली आहेत. विविध रंगांनी बोटी रंगून बंदरे आता रंगीबेरंगी झाली आहेत, तर बोटी माडांच्या ओंड्यावरून ट्रॅक्टरच्या सहाय्याने खेचून समुद्रात उतरवण्याच्या कामांना वेग आला आहे.

शहरातील समुद्रकिनारी कोळीबांधव आपली होडी ट्रॅक्टरच्या साहाय्याने समुद्रात उतरवताना दिसत आहे. तालुक्यातील ७५० मोठ्या होड्या समुद्रात मासेमारीसाठी रवाना होत आहे. पावसाळी हंगामात मासळी जर चांगली मिळाली तर सुगीचे दिवस प्राप्त होणार आहेत. मासळी चांगली प्राप्त व्हावी यासाठी देवाकडे साकडे मांडले जात आहेत. मोठ्या होड्या या किमान १२ दिवस खोल समुद्रात मासेमारी करून नंतर मुंबई किनारा गाठला जातो.

जिल्हा मच्छीमार संघाचे उपाध्यक्ष मनोहर बैले यांनी सांगितले की, मासेमारी व्यवसायामुळे आपल्या देशाला परकीय चलन प्राप्त होते. उरण व मुंबई यांसारख्या मोठ्या बंदरातून चविष्ट मासे मोठ्या प्रमाणात विक्री होत असतात. यंदाचा मासेमारी हंगाम चांगला जाणार आहे. सुमारे ७० टक्के होड्या मासेमारीसाठी रवाना झाल्या असून यंदा मोठी मासेमारी होऊन चांगले यश प्राप्त होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

पान १ वरून

## पनवेलमधील सुकापूर परिसरात विकासाची गंगा

युवा मोर्चा तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, सरपंच योगिता पाटील, ज्येष्ठ नेते चाहूशेठ पोपेटा, किशोर सुरते, सुनील पाटील, जनार्दन पाटील, हनुमान खुटले, राजेश पाटील, ज्ञानेश्वर पाटील, उदय म्हसकर, आत्माराम पाटील, नामदेव पोपेटा, परशुराम पाटील, महेश केणी, आनंद म्हसकर, प्रमोद सावंत, संदीप वाघमारे, प्रिया वाघमारे, उपसरपंच दिवेश भगत, माजी उपसरपंच दत्तात्रेय भगत, ग्रामपंचायत सदस्य अशोक पाटील, महेश पाटील, चेतन केणी, पुष्पा म्हसकर, अनिता पाटील, प्राची जाधव, माजी सदस्य योगेश पाटील, संजय पाटील, भरत म्हसकर, शिवराम शेळके, जनार्दन पाटील, पंढरी ठाकूर, रूपेश पाटील, राहुल पोपटा, राकेश भुजबळ, नारायण पाटील, सुरेश मुकादम, डॉ. कृष्णा देसाई, अनिकेत कसाल, अनिकेत पाटील, जयसिंग वाघमारे, सादिक सय्यद, रूपेश यादव, ग्रामविकास अधिकारी सुदीन पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, आजूबाजूच्या सोसायट्यांचे अध्यक्ष, सेक्रेटरी, ग्रामपंचायत कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.

या वेळी पाली देवद (सुकापूर) येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प, प्रभाग क्रमांक पाचमधील वरदविनायक सोसायटी ते बालाजी मंदिर रस्ता कॉँक्रीटीकरण व एकनाथ भोपी निवास ते स्मशानभूमीपर्यंतचा रस्ता यांचे उद्घाटन, तर एक्स्प्रेस वे पुष्पश्री सोसायटी ते जरीमरी मंदिरपर्यंतचा रस्ता कॉँक्रीटीकरण, समृद्धभूमी सोसायटी येथील रस्ता कॉँक्रीटीकरण व मालेवाडी बसस्टॉप ते साक्षी पार्क २पर्यंतचा रस्ता कॉँक्रीटीकरण यांचे भूमिपूजन झाले. ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, राज्य शासनाचा १५वा वित्त आयोग, जिल्हा नियोजन समिती निधी अशा वेगवेगळ्या आस्थापनांचे या विकासात योगदान आहे.

## महाराष्ट्रातील प्रत्येक साखर कारखान्यात इथेनॉलची निर्मिती व्हायला हवी -ना. शाह

पुण्याला सहकाराची पंढरी म्हटले जाते आणि देशातील सहकारी संस्थांच्या तुलनेत एकट्या महाराष्ट्राचा वाटा हा ४२ टक्के आहे. महाराष्ट्राचे हेच योगदान दाखवण्यासाठी पोर्टलच्या उद्घाटनासाठी पुण्याची निवड केली, असे सांगून मंत्री अमित शाह म्हणाले की, आता तुम्हाला तुमच्या गावात, जिल्ह्यात किंवा राज्यातील सहकार क्षेत्राशी संबंधित सगळी माहिती उपलब्ध होणार आहे. त्यासाठी सहकार क्षेत्राचा मोठा डेटा आम्ही तयार करीत आहोत. हा डेटा बनवण्याचे ९५ टक्के काम पूर्ण झाले आहे. या डेटामुळे प्रत्येक वरिष्ठांना आपल्या गावाची संपूर्ण माहिती लगेच मिळेल आणि त्यानुसार उपाययोजना करण्यात येईल.

गेल्या काही महिन्यांपासून सहकार क्षेत्राबाबत अनेक निर्णय घेतले आहेत. या निर्णयांमुळे शेतकऱ्यांच्या मोठ्या समस्या सुटल्या आहेत. यापुढे कोणाच्याही नातेवाईकाला नोकरी मिळणार नाही, तर फक्त कौशल्य असलेल्या व्यक्तीलाच नोकरी मिळणार आहे. सहकारी बँकांना मोठे अधिकार दिले आहेत. आता सहकार क्षेत्राशी संबंधित कारभार पारदर्शक होणार आहे, असेही मंत्री शाह यांनी नमूद केले.

**अजितदादा आता योग्य ठिकाणी बसलेत!**

*या वेळी केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबाबत भाष्य केले. अजित पवार उपमुख्यमंत्री झाल्यानंतर ते पहिल्यांदाच आपल्या कार्यक्रमात आहेत. माझ्यासोबत ते पहिल्यांदाच बसलेले आहेत. त्यामुळे सर्वांत आधी मी त्यांना सांगू इच्छितो की, अजितदादा आज तुम्ही योग्य ठिकाणी बसलेला आहेत. या ठिकाणी बसण्यासाठी तुम्ही थोडा उशीरच केला, पण हीच तुमची योग्य जागा आहे, असे ना. शाह म्हणाले.*

## कामोठ्यातील युवा कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

या वेळी सामाजिक कार्यकर्ते प्रदीप भगत यांच्या नेतृत्वाखाली असंख्य युवा कार्यकर्त्यांनी विकासाचे 'कमळ' हाती घेतले. यामध्ये आयुष किंद्रे, राहुल बांदेकर, जांबाज खान, पियुष पाटील, वैभव ढेंबरे, निलेश जाधव, मयूर अवघडे, शुभम दाभणे, सुमित शर्मा, साई शेलार, मल्हार शेडगे, राज नील, चैतन्य रंधीरे, आकाश सिंग, आयुष कटूरे, हर्ष तिवारी, रोहित चौहान, सोहम तोतरे, रोहित यादव, रोहित साळुंके, राहुल वाघमारे, क्रिश सिंग, साहिल गुंड, नयन चौगुले, आदित्य बरई, योगेश मोरे, नीरज सावंत, विनय ढाक, प्रसाद पंडित, जितेंद्र जगताप, दिव्येश संप्पा, तन्मय थोरात, इशांत गोरडे, ध्रुव भोईर, सुमित शर्मा, आदित्य साबळे, सिनू वाल्मिकी, आदित्य चव्हाण, यश भोसले व उदय शेलार यांचा समावेश आहे. या सर्वांचे आमदार प्रशांत ठाकूर व अन्य मान्यवरांनी भाजपची शाल देऊन पक्षात स्वागत केले.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम

## कळंबोलीत सामाजिक कार्यक्रम






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक तथा माजी स्थायी समिती सभापती अमर पाटील यांच्या वतीने ग्रंथतुला आणि सेवा सन्मान तसेच सफाई कामगार आणि ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला आहे. कळंबोली येथील सुधागड स्कूल येथे झालेल्या कार्यक्रमात आमदार प्रशांत ठाकूर यांची वाढदिवसानिमित्त ग्रंथ तुलादेखील करण्यात आली.

मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांचा वाढदिवस शनिवारी सर्वत्र साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त कुठेही जाहिरातबाजी, बॅनरबाजी करू नये तसेच पुष्पगुछ, भेटवस्तू आणू नका त्याऐवजी सामाजिक सेवाकार्यात योगदान द्यावे असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत माजी नगरसेवक अमर पाटील यांच्या वतीने ज्येष्ठ नागरिक आणि पनवेल महापालिका क्षेत्रातील सर्व कर्मचारी यांना छत्रीचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमावेळी भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी स्थायी समिती सभापती अमर पाटील, भाजप कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक बबन मुकादम, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, मोनिका महानवर, युवा नेते हॅप्पी सिंग, युवा मोर्चा अध्यक्ष मयुरेश नेतकर, अशोक मोटे, मनीषा निकम, संदीप म्हात्रे, सुनील ढेब्रे, दुर्गा सहानी, युवा नेते अमर ठाकूर, नीता अधिकारी, बबलू शेख, भाजप सरचिटणीस दिलीप बिस्ट, संजय दोडके, गौरव नाईक, भूषण जळे, सुभला साखरे, श्वेता नागदाळे, पालवे सर यांच्यासह आदी उपस्थित होते.

## जाणीव एक सामाजिक संस्थेतर्फे गीत रामायण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त जाणीव एक सामाजिक संस्थेच्या वतीने प्रभू श्रीरामचंद्रांच्या चरित्रावर आधारित सामगंध प्रस्तुत गीत रामायण कार्यक्रम, आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाचे आयोजन शनिवारी पनवेलमधील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात करण्यात आले होते. या वेळी वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांना श्री रामाची प्रतिमा भेट म्हणून देण्यात आली. या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ आणि शकुंतला रामशेठ ठाकूर यांनी सदिच्छा भेट दिली.

या वेळी उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, संस्थेचे संस्थापक माजी नगरसेवक नितीन पाटील, अजय बहिरा, माजी पं. स. सदस्य रत्नप्रभा घरत, सुलोचना कल्याणकर, भाजप कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, पनवेल शहर सरचिटणीस अमरीश मोकल, ओबीसी युवा मोर्चा उत्तर रायगड अध्यक्ष प्रसाद म्हात्रे, सोशल मीडिया सेल शहर संयोजक प्रसाद हनुमंते, उमेश इनामदार, प्रसाद कंधारे, रूपेश नागवेकर,महेश सरदेसाई,सचिन नाझरे, चंद्रकांत पाटील, प्रितम म्हात्रे, विजय डिसोझा, नरेंद्र सोनावणे, डॉ. एस. टी. गडदे, यांच्यासह संस्थेचे कार्यकर्ते उपस्थित होते.





## पनवेलमध्ये रंगली संगीत मैफिल





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही संगीत मैफील झाली. श्री. रामशेठ सामाजिक विकास मंडळ व नादब्रम्ह साधना मंडळ खारघर व पनवेल तालुका सांस्कृतीक सेल यांच्या संयुक्त विद्यमाने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त सुश्राव्य संगीत मैफिल या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन शनिवारी पनवेल तालुक्यातील मार्केड यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ सभागृहात करण्यात आले. या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ यांनी भेट दिली. या कार्यक्रम शास्त्रीय, सुगम व भजन संगीताची सुश्राव्य मैफिल सादर करण्यात आली. शास्त्रीय गायन श्री. उमेश यांनी आणि त्यांचे दोन सुपुत्र मंगेश आणि अक्षय यांनी सादर केले. गायनाचा कार्यक्रम हा रश्मी मोघे यांनी बहारदार सादर केला. आणि अभंगवाणी नादब्रम्हच्या सभासदांनी भैरवी घेऊन पार पाडली.

आमदार प्रशांत ठाकूर यांचा वाढदिवस साजरा करतेवेळी आमदारांवर कविता आणि पोवाडा सादर केला. हा कार्यक्रम पनवेल सांस्कृतीक सेलचे अध्यक्ष उमेश चौधरी यांच्या प्रयत्नातुन सादर करण्यात आला. दरम्यान, अविनाश कोळी यांची उत्तर रायगड जिल्हा अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

या वेळी उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, भारतीय जनता पक्षाचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, वसंत पाटील, जे. टी. पाटील, अनिश ढवळे, पुनम ठाकूर, महादेव बुवा शहाबाजकर आदी उपस्थित होते.

## श्री साई नारायण बाबा चॅरिटेबल ट्रस्टतर्फे शालेय साहित्याचे वाटप



**पनवेल : वार्ताहर**

सद्गुरू श्री साई नारायण बाबा यांच्या आशीर्वादाने यांच्या ४८व्या वर्षी पनवेल परिसरातील ६०० शालेय विद्यार्थ्यांना पनवेल रेल्वे स्टेशन जवळील साईबाबा मंदिरात आज शालोपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले.

श्री साई नारायण बाबा चॅरिटेबल ट्रस्ट, श्री साई नारायण बाबा आश्रम, श्री साई बाबा मंदिर पनवेल यांच्यावतीने यांच्या ४८ व्या वर्षी सद्गुरू साई नारायण बाबा यांच्या आशीर्वादाने पनवेल परिसरातील गरीब व गरजू शालेय विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्यांसह शाळेचा गणवेश व दप्तरचे वाटप पनवेल महापालिकेच्या माजी महापौर कविता चौतमोल यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी माजी नगरसेवक अजय बहिरा, शास्त्रीजी विश्वनाथ भट, रामलाल चौधरी, राम थदानी, साईसेवक रमेश भोळे, पत्रकार संजय कदम, डॉ. शकुंतला आदी उपस्थित होते. या वेळी प्रथमच श्री सैनारायन बाबा यांनी लिहिलेल्या ज्ञानसागर पुस्तकाचे मोफत वाटप उपस्थित विद्यार्थी व शिक्षकांना करण्यात आले.

## आदिवासी मुलांना खाऊवाटप

**उरण : वार्ताहर**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने उरण तालुक्यातील जांभूळपाडा वाडी व चिरले गावठाण, बोटकीची वाडी येथील आदिवासी मुलांना खाऊवाटप करण्यात आले. या वेळी चिरले गावाच्या सामाजिक कार्यकर्त्या विश्रांती रमाकांत घरत यांच्या मार्गदर्शनाखाली झाला.

सामाजिक कार्यकर्त्या विश्रांती घरत यांनी आजपर्यंत अनेकवेळा आदिवासी वाडीतील लोकांना मदत केली आहे. कुणी महिला आजारी असेल तर स्वखर्चाने दवाखान्यात नेणे, त्यांच्यावर मोफत उपचार करणे, आदिवासी वाडीत विजेच्या सोयीसाठी विजेचे खांब मंजूर करणे. आपला वाढदिवस आदिवासी मुलासोबत साजरा करणे, मुलांना खाऊ वाटप करणे, नेहमीच मदत करणे अशी विविध प्रकारची मदत करून ती आपले समाजाची सेवा करीत आहे.



## विचुंबे येथे आरोग्य तपासणीसह नेत्र तपासणी व चष्मेवाटप शिबिर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त भाजप विचुंबे, मंगलमूर्ती मित्र मंडळ व दुर्गामाता मित्र मंडळ आणि ग्रामस्थ मंडळ विचुंबे यांच्या वतीने आणि आर.जे.शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व मेडिकवर हॉस्पिटल खारघर यांच्या सहकार्याने मोफत आरोग्य तपासणी आणि नेत्र तपासणी व चष्मे वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिराचे आयोजन पनवेल तालुक्यातील विचुंबे गावातील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत करण्यात आले. या वेळी या शिबिराला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली.

या वेळी पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, पनवेल पंचायत समिती माजी सदस्य भूपेंद्र पाटील, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, अमित जाधव, भाजप विचुंबे अध्यक्ष के. सी. पाटील , नितीन भोईर, उपसरपंच प्रमोद भिंगारकर, माजी उपसरपंच रवींद्र भोईर, माजी उपसरपंच किशोर सुरते, अनुसूचित जाती जमाती अध्यक्ष अविनाश गायकवाड, अप्पा गायकवाड, अनिल भोईर, राम म्हात्रे, डी.के. भोईर, महेश भिंगारकर, चेतन सुरते, संजीत भिंगारकर, कल्पेश भोईर, प्रेम भिंगारकर, सुनील पाटील, विवेक भोईर, अनंत गोंधळी, जगदीश भोईर, शाम म्हात्रे, संदीप पाटील आदी उपस्थित होते.







**पनवेल : पाली देवद (सुकापूर) ग्रामपंचायतीच्या वतीने विविध विकासकामांचे उद्‌घाटन व भूमिपूजन कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांच्याच हस्ते रविवारी करण्यात आले.**

## आदई येथे डोळे तपासणी, चष्मेवाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त भाजप युवा कार्यकर्ते जगदीश शेळके आणि आदई नेवाळी उपसरपंच योगेश पाटील यांच्या वतीने आणि एस. एन. आय. हॉस्पिटल यांच्या सौजन्याने मोफत डोळे तपासणी आणि मोफत चष्मे वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले. या वेळी या शिबिराला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली.





या शिबिराला पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, पंचायत समिती माजी सदस्य भूपेंद्र पाटील, पद्माकर शेळके, पद्माकर काकडे, अनंता पाटील, भाई पाटील, माजी सरपंच महादू शेळके, बाळाराम पाटील, प्रियंका भंडारी, सुगंधा पाटील, प्रदीप कांबळे, शंकर पाटील, जनार्दन पाटील, श्रीचन भंडारी, राजेश काकडे, कैलास पाटील, तेजस म्हात्रे, रोहित पाटील, निलेश पाटील, ज्ञानेश्वर पाटील, एकनाथ शेळके, उद्धव पाटील, सत्या खाडे, राम शेळके, किशोर म्हात्रे, गणेश म्हात्रे, राहुल पाटील, सुरज पाटील, दत्ता शेळके, आत्माराम भोपी, विजय पाटील, मंगेश भोपी, शरद ठाकूर, जयेश पाटील, प्रवीण पाटील, रवी शेळके, रोहित शेळके, सुरज म्हात्रे, अनिष पाटील, मनोज शेळके, शशीर शेळके, सचिन शिंदे, रोहित झगडे, विवेक पाटील, अशोक पाटील, कृष्णा भगत, रोहन पाटील यांच्यसह इतर मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.





**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त माजी आमदार संदीप नाईक यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर उपस्थित होते. त्याचप्रमाणे भाजप तालुका उपाध्यक्ष विद्याधर जोशी यांनीही आमदार प्रशांत ठाकूर यांचे अभीष्टचिंतन केले.**

## संपादकीय

# वेगवान विकास

आपल्याकडे एक म्हण आहे इच्छा तिथे मार्ग. जर काहीतरी करण्याची इच्छाशक्ती असेल तर मार्ग सापडतोच आणि दूर्दम्य इच्छाशक्ती असल्यावर तर काय करता येऊ शकते हे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने गेल्या नऊ वर्षांत दाखवून दिले आहे. उत्तुंग व विधायक कार्यातून मोदी सरकारने देशाचा कायापालट केला आहे. आता राज्यातही ट्रिपल इंजिन सरकार असल्याने यापूर्वी रखडलेल्या कामांना गती मिळाली आहे.

**आपल्या देशात लोकशाही अस्तित्वात आहे. जनता निवडणूक प्रक्रियेतून लोकप्रतिनिधी निवडून देते आणि या लोकप्रतिनिधींनी आपल्या अधिकाराचा वापर करीत जनतेला सोयीसुविधा पुरवून परिसराचा विकास साधणे अपेक्षित असते. सत्तेची चटक लागलेले काँग्रेसवाले नेमके हेच विसरले आणि स्वत:च्याच विकासात रमले. त्यामुळे देशातील सुज्ञ जनतेने त्यांना त्यांची जागा दाखवून देत २०१४मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना देशाचे नेतृत्व करण्याची संधी दिली. विकास काय असतो हे पंतप्रधान मोदींनी ते गुजरातचे मुख्यमंत्री असतानाच दाखवून दिले होते, पण ते एक राज्य होते. एवढ्या मोठ्या तेही विविधांगी असलेल्या देशाचा कारभार पाहणे सोपे काम नव्हते. शिवाय विविध घोटाळ्यांमुळे देशाची आर्थिक स्थिती खालावली होती आणि जागतिक पातळीवर प्रतिमाही मलिन झाली होती. कडक शिस्त व प्रचंड मेहनती असलेल्या नरेंद्र मोदींनी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यावर सर्वप्रथम लोकाभिमुख व पारदर्शक कारभारास प्राधान्य दिले. त्याचवेळी विकासकामांवर लक्ष्य केंद्रित केले. बघता बघता देशाचे रूप बदलले आणि जगभरात भारताचा गवगवा होऊ लागला. जे बडे देश भारताला हीन समजत होते तेच पायघड्या घालू लागले. हा सकारात्मक बदल मोदी सरकारने घडवून आणला. विविध योजनांद्वारे त्यांनी निरनिराळ्या घटकांना बळ दिले. त्यांच्यासाठी ठरवून दिलेला लाभ त्यांच्या थेट बँक खात्यामध्ये जमा होऊ लागला. काँग्रेसच्या काळात अनेक घोषणा व्हायच्या, मात्र त्या जनतेपर्यंत अभावानेच पोहचायच्या आणि पोहचल्याच तर त्यातील नाममात्र रक्कम संबंधित लाभार्थ्यांच्या पदरी पडत असे. पंतप्रधान मोदींनी ही पद्धत बदलली. जे ज्याचे आहे ते त्यालाच मिळाले पाहिजे याकडे त्यांनी काटेकोरपणे लक्ष दिले. शेतकरी, सर्वसामान्य, महिला, वृद्ध अशा सगळ्यांसाठी त्यांनी योजना, निर्णय, उपक्रम राबविले. त्यांच्या याच सबका साथ सबका विकास सूत्रामुळे जनतेने त्यांना पुन्हा एकदा पंतप्रधानपदी विराजमान केले. त्यानंतर पुन्हा एकदा नव्या जोमाने ते कार्यरत आहेत. राज्यातही त्याच विचारांचे सरकार आल्याने साहजिकच विकासाला वेग आला आहे. भाजपच्या जोडीला गेल्या वर्षी शिवसेना नेते एकनाथ शिंदे आले होते. त्यानंतर अलीकडेच राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार यांनीही साथ दिली. त्यामुळे आता तीन मजबूत पक्षांचे व नेत्यांचे सरकार राज्यात कार्यरत झाल्याने मोठ्या प्रमाणात कामे होत आहेत. विविध प्रकल्प साकारत आहेत. नुकतेच पंतप्रधान नरेंद्र मोदी गे लोकमान्य टिळक पुरस्काराच्या निमित्ताने पुण्यात येऊन गेले. त्या वेळी त्यांनी पुण्यातील दोन मेट्रो मार्गिकांना हिरवा झेंडा दाखवला. त्याचप्रमाणे गृहप्रकल्पांचे उद्घाटन व भूमिपूजन केले. त्यानंतर शनिवार व रविवारी गृहमंत्री अमित शाह पुणे दौर्‍यावर होते. त्यांच्या हस्ते सहकार संस्थेने निर्माण केलेल्या पोर्टलचे लाँचिंग करण्यात आले. एकूणच केंद्र सरकारचे महाराष्ट्राकडे विशेष लक्ष असून राज्याच्या विकासात भरीव योगदान दिले जात आहे.**

# कर्जत तालुक्यातील रस्ते खड्डेमुक्त करण्याची गरज

कर्जत तालुक्यात अनेक रस्त्यांची कामे झाली आहेत, मात्र त्यातील बहुतांश रस्ते काही न काही कारणाने पूर्ण झालेले नाहीत. ही परिस्थिती राज्य महामार्गापासून अगदी छोट्या गावांना जोडण्यासाठी तयार केलेल्या रस्त्यांचीही आहे. जे रस्ते केलेत ते निकृष्ट दर्जाचे आहेत, असा नागरिकांचा आरोप आहे. पावसात रस्ते धुवून गेले आहेत. अनेक रस्त्यांवर खड्डे असल्याने अपघात होत आहेत. त्यात विशेषतः मोटरसायकल वरून प्रवास करणार्‍या मागे बसलेल्या महिलांचा समावेश आहे.



कर्जत तालुक्यात तत्कालीन आमदार देवेंद्र साटम यांनी खर्‍या अर्थाने रस्त्यांचे जाळे पसरविले होते. त्यांनी कामाचा इतका धडाका लावला होता की, त्यांनी कर्जत-खालापूर तालुक्यात दोन दिवसांत एकशे एक भूमिपूजन आणि उद्घाटन सोहळे केले होते. साटम यांनी तीन वेळा कर्जत-खालापूर मतदार संघाचे विधानसभेत नेतृत्व केले होते. कर्जत-मुरबाड रस्ता गेल्या चार वर्षांपासून सुरू आहे. या रस्त्याचे काम काही ठिकाणी सुरू आहे,



**खबरबात**
**विजय मांडे**

मात्र बर्‍याच ठिकाणी हा रस्ता दोन पदरी आहे. पावसाने रस्ते अक्षरशः धुवून गेल्याने रस्त्यांची चाळण झाली आहे. खड्डे चुकविण्याच्या नादात अपघात होतात तसेच मोटरसायकल चालकांना वाहन चालवताना खूपच याता यात करावी लागते. त्यामुळे हा रस्ता सध्या काँक्रीट करण्याऐवजी डांबरीकरण करून दुरुस्त करावा, अशी मागणी या भागातील लोकांची आहे. कारण ठिकठिकाणी काँक्रीटीकरणाचे काम सुरू आहे, मात्र एक बाजूचा रस्ता होत असताना दुसर्‍या बाजूने वाहने जाताना मोठी अडचण होत आहे.

कर्जत-कल्याण रस्त्यावरही अनेक ठिकाणी निमुळता रस्ता आहे. काही कारणांनी तेथे रुंदीकरण करण्यात आले नाही. या रस्त्यावर आवश्यक ठिकाणी गतीरोधक हवे होते ते त्यावेळी झाले नाहीत. हा रस्तासुद्धा काही ठिकाणी खराब झाला आहे. लोकांच्या मागणीनंतर बसवण्यात आलेले गतिरोधकांची परिस्थिती दयनीय झाली होती. शाळा असलेल्या ठिकाणीसुद्धा गतिरोधकांची मागणी केली होती. तेथे ते बसविण्यात आले, मात्र त्यासाठी शिक्षक पालक संघाला पाठपुरावा करावा लागला.

कर्जत-पळसदरी मार्गे खोपोली रस्त्यातसुद्धा अनेक ठिकाणी अरुंद आहे. काही ठिकाणी अर्धवट आहे. या रस्त्याचे काम पूर्ण झाले नाही तोच टोल नाक्याची तयारीसुद्धा करण्यात आली आहे. या रस्त्यावर खड्डे पडले असताना दोन तीन मोटरसायकल चालकांचा मृत्यूही या रस्त्यावर झाला आहे. हा रस्तासुद्धा पाच वर्षांपासून होत आहे. हा रस्ता कधी पूर्ण होणार? याची चर्चा नेहमीच होत असते. कशेळे-कोठिंबे रस्ता अनेक महिन्यांपासून अत्यंत खराब आहे. आदिवासी भागातील बहुतांश रस्ते खराब झाले आहेत. कर्जत तालुक्यात रायगड जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, राज्य रस्ते विकास महामंडळ आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडून रस्त्यांची कामे केली जातात. या सर्व खात्यांच्या अखत्यारीत असलेल्या रस्त्यांवर पावसामुळे आणि नित्कृष्ट कामामुळे खड्डे पडले आहेत. त्या खड्ड्यांची दुरुस्ती बांधकाम खात्याच्या कोणत्याही कार्यालयाकडून केली जात नाही. भारतीय जनता पक्षाने रस्त्यांच्या कामांसंदर्भात आवाज उठवला होता. यासोबतच मनसेनेही लक्ष वेधले होते. तर शिवसेनेने पळसदरी रस्त्याचे खड्डे भरण्याचे काम केले होते.

कर्जत-चौक रस्ता आता बरा झाला होता, मात्र पावसामुळे पुन्हा खड्डे पडले आहेत. काही वर्षांपूर्वी या रस्त्याची चाळण झाली होती. नऊ किलोमीटरवर रस्त्यासाठी पाऊण तास लागत असे. वेळेवर खड्डे भरले तर हा रस्ता वाहन चालकांना सोयीचा होईल. कर्जत-कोंडीवडे, कर्जत-जांभिवली रस्त्याची अवस्थासुद्धा अनेक ठिकाणी खराब आहे. पोसरी-साळोख रस्ता हल्ली हल्ली केला होता, मात्र तो रस्तासुद्धा काही ठिकाणी खराब झाला आहे. मांडवणे ते पेज नदीकडे येणार्‍या रस्त्याची खूप दुरवस्था झाली आहे. त्याच्यावर डांबर शोधावी लागेल. नेरळ भागातील कशेळे-नेरळ रस्ताही चांगला करण्याची गरज आहे. तसेच नेरळ-कळंब रस्त्याचे कामही रखडत चालले आहे. भडवळ रस्ताही खराब आहे. खांडपे-तिवणे-सांडशी रस्त्याचे कामही चार वर्षांपासून सुरू होते. अनेक महिने ते काम बंद होते. ग्रामस्थांच्या आंदोलनामुळे ते सुरू करण्यात आले आहे. इतकेच काय? रेल्वे पूल ते श्रीराम पूल या रस्त्याची तर कहाणीच वेगळी आहे. या रस्त्यावर काँक्रीट, पेव्हर ब्लॉक, डांबरीकरण यांचे प्रयोग केले आहेत की काय? असे वाटते. या रस्त्यावर गणपती मंदिर समोर असे खड्डे आहेत की, तेथे मोटरसायकल स्वारांचे अपघात होत असतात. एकंदरीत तालुक्यातील रस्ते सुस्थितीत होण्यासाठी ठेकेदारांची मानसिकता झाली पाहिजे.



## बदलते तंत्रज्ञान

# पासपोर्ट अर्ज प्रक्रियेत डिजीलॉकरला परवानगी

आजपासून म्हणजेच ५ ऑगस्टपासून आंतरराष्ट्रीय प्रवासासाठी पासपोर्ट अर्ज प्रक्रियेत मोठा बदल करण्यात आला आहे. आता नवीन पासपोर्टसाठी अर्ज करण्यासाठी प्रवाशांना डिजीलॉकर वापरून आवश्यक कागदपत्रे अपलोड करावी लागतील. डिजीलॉकर हा सरकारी प्लॅटफॉर्म आहे.

कागदपत्रे अपलोड झाल्यानंतर अर्जदार www.passportindia.gov.in या अधिकृत वेबसाइटद्वारे आपले पासपोर्ट अर्ज ऑनलाइन सबमिट करू शकतील. परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, जर अर्जदारांनी आपली कागदपत्रे डिजीलॉकरद्वारे अपलोड केली असतील तर त्यांना अर्ज प्रक्रियेदरम्यान ओरिजनल फिजिकल कॉपी आणण्याची आवश्यकता नाही.

डिजीलॉकर हे इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाद्वारे प्रदान केलेली डिजिटल वॉलेट सेवा आहे. यामध्ये युजर्स ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन नोंदणी प्रमाणपत्र आणि मार्कशीट सारखी सरकारी कागदपत्रे सुरक्षितपणे स्टोअर आणि ॲक्सेस करू शकतात. मंत्रालयाने आता ऑनलाइन अर्ज सबमिट करण्यासाठी डिजीलॉकरद्वारे आधार कागदपत्रांचा वापर करण्यास परवानगी दिली आहे.

युजर्स डिजीलॉकरमध्ये शैक्षणिक प्रमाणपत्रे, जन्म प्रमाणपत्रे, पॅन कार्ड, आधार कार्ड, पासपोर्ट आणि मतदार ओळखपत्र यासारखी महत्त्वाची अधिकृत कागदपत्रे देखील स्टोअर करू शकतात आणि ॲक्सेस करू शकतात. हा बदल अर्ज प्रक्रियेला गती देण्यासाठी आणि विविध क्षेत्रांमधील पासपोर्ट सेवा केंद्र (PSKs) आणि पोस्ट ऑफिस पासपोर्ट सेवा केंद्र (POPSKs) येथे फिजिकल डॉक्युमेंट व्हेरिफिकेशनची गरज कमी करण्यासाठी लागू करण्यात आला आहे.

डिजीलॉकर वापरण्याचा निर्णय PSKsवर फिजिकल डॉक्युमेंट व्हेरिफिकेशनदरम्यान आढळलेल्या त्रुटींमुळे घेण्यात आला आहे. जसे की चुकीची जन्मतारीख आणि वैयक्तिक माहिती. डिजीलॉकर लागू करून, सादर केलेल्या कागदपत्रांची अचूकता आणि सत्यता सुनिश्चित करण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे.


डिजीलॉकर खाते उघडण्यासाठी, वापरकर्त्यांना एक मोबाइल नंबर द्यावा लागेल जो आधीपासून आधारशी लिंक आहे. DigiLocker खात्याची नोंदणी करताना, वापरकर्त्यांना लिंक केलेल्या मोबाइल नंबरवर एक जढ्झ प्राप्त होईल. वापरकर्त्यांना नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी त्याचा वापर करावा लागेल. DigiLocker खाते नाव अपडेट किंवा मोबाइल नंबर अपडेट यासारखे कोणतेही बदल करण्यासाठी, वापरकर्त्यांनी प्रथम तो डेटा आधारमध्ये अपडेट करणे आवश्यक आहे.

# जगप्रसिद्ध भारतीय कवी रवींद्रनाथ टागोर

रवींद्रनाथ ठाकूर यांचा जन्म ७ मे १८६१ साली झाला होता. यांना गुरुदेव असे ही संबोधले जाते. रवींद्रनाथ टागोर एक ब्राह्मोपंथीय, चित्रकार, नाटककार, कादंबरीकार, बंगाली कवी, संगीतकार होते. आज त्यांचा स्मृतीदिन आहे.

ते त्याच्या आई वडिलांचे १३ वे अपत्य होते. लहानपणापासूनच त्यांना 'रबी' असे संबोधले जात असे. कोलकात्याच्या पिराली ब्राह्मण कुटुंबात जन्म झालेल्या रवीन्द्रनाथांनी वयाच्या ८ व्या वर्षी पहिली कविता लिहिली. वयाच्या १६ व्या वर्षी त्यांनी भानुसिंह या टोपणनावाने बर्‍याचशा कविता लिहिल्या. रवीन्द्रनाथांनी रचलेली जन गण मन व आमार शोनार बांग्ला ह्या रचना अनुक्रमे भारत व बांग्लादेश यांची राष्ट्रगीते म्हणून स्वीकारण्यात आल्या आहेत. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या प्रारंभी यांच्या कार्यामुळे बंगाली साहित्यात व बंगाली संगीतात एक आमूलाग्र बदल घडून आला. रवींद्रनाथ हे भारताचे व आशियातील पहिले नोबेलविजेते होते.

आपल्या आयुष्यात त्यांनी एक हजार कविता, आठ कादंबर्या, आठ कथा संग्रह आणि विविध विषयांवर अनेक लेख लिहिले. एवढेच नव्हे तर रवींद्रनाथ



**निमित्त**

टागोर हे संगीतप्रेमी होते आणि त्यांनी त्यांच्या जीवनात २००० पेक्षा जास्त गाणी रचली. त्यांनी लिहिलेली दोन गाणी म्हणजे आज भारत आणि बांगलादेशचे राष्ट्रगीत.


आयुष्याच्या ५१ वर्षांपर्यंत त्यांच्या सर्व कर्तृत्त्वे आणि यश फक्त कोलकता आणि आसपासच्या क्षेत्रात मर्यादित राहिले. वयाच्या ५१ व्या वर्षी ते आपल्या मुलासह इंग्लंडला जात होते. भारत व इंग्लंडला समुद्री मार्गाने जाताना त्यांनी गीतांजली या त्यांच्या काव्यसंग्रहाचे इंग्रजी भाषांतर करण्यास सुरवात केली. गीतांजली अनुवाद करण्यामागे त्यांचा कोणताचं हेतू नव्हता, फक्त प्रवासात वेळ घालविण्यासाठी काहीतरी करण्याच्या उद्देशाने त्यांनी गीतांजलीचे भाषांतर करण्यास सुरवात केली. त्याने एका नोटबुकमध्ये हाताने गीतांजलीचे इंग्रजीमध्ये भाषांतर केले.

लंडनमध्ये जहाजातून उतरताना त्याचा मुलगा नोटबुक ठेवलेला सूटकेस विसरला. ही ऐतिहासिक कृती सुटकेसमध्ये बंद राहण्यासाठी नव्हती. ज्याला तो सूटकेस मिळाला त्या व्यक्तीने दुसर्याच दिवशी रवींद्रनाथ टागोरांकडे ती सुटकेस दिली. लंडनमधील टागोरचा इंग्रज मित्र असलेल्या चित्रकार रोथेन्स्टाईन यांना हे समजले की गीतांजलीचे भाषांतर रवींद्रनाथ टागोर यांनीच केले होते आणि त्यांनी ते वाचण्याची इच्छा व्यक्त केली. गीतांजली वाचल्यानंतर रोथेन्स्टाईन मुग्ध झाले आणि त्यांनी आपल्या मित्र डब्ल्यू.बी. यांनी गीतांजलीबद्दल सांगितले आणि वाचण्यासाठी नोटबुक दिली. त्यानंतर जे घडले ते इतिहास आहे. येट्सने स्वत: गीतांजलीच्या इंग्रजीच्या मूळ आवृत्तीची प्रस्तावना लिहिले. सप्टेंबर १९१२ मध्ये भारत सोसायटीच्या सहकार्याने गीतांजलीच्या इंग्रजी भाषेच्या काही मर्यादित प्रती प्रकाशित झाल्या.

टागोर हे केवळ भारताचेच नाही तर जगभरातील साहित्य, कला आणि संगीत यांचे एक महान प्रकाश स्तंभ आहे, जे सर्वकाळ तेजस्वी राहतील.

**(साभार : मराठी वेबदुनिया)**


**क्लिक...क्लिक...!**



**पनवेल : पावसामुळे गाढेश्वर धरण परिसराला निसर्गाचा साज चढला आहे. त्याचे संस्कृती पाटील हिने टिपलेले छायाचित्र.**

## आरोग्य प्रहर

# अति तणाव असल्यास 'असे' करा मन शांत




वडीलधार्‍यांकडून आपल्याला अनेकदा तणावमुक्त राहण्याचा सल्ला दिला जातो. मानसिक आरोग्याशिवाय आपण शरीर निरोगी ठेवू शकत नाही. नैराश्य आपल्यासाठी धोकादायक ठरू शकते. आपण छोट्या छोट्या गोष्टींची चिंता करू नये, कारण तो तोट्याचा सौदा आहे, त्याऐवजी सकारात्मक कसे रहावे यावर भर द्या.

**तणाव का येतो?**

मानसिक ताण अनेक कारणांमुळे येऊ शकतो, सहसा मैत्री किंवा प्रेमात फसवणूक, पैशाची कमतरता, बेरोजगारी, इच्छा पूर्ण न होणे, दीर्घ आजारपण, परीक्षेत नापास होणे, लग्न होऊ न शकणे, कुटुंबापासून दूर राहणे, मुले नसणे आणि अनंत गुंतागुंत यामुळे मानसिक ताण तणाव दूर होऊ शकतो, परंतु काही गोष्टींची काळजी घेऊन आपण तणावावर मात करू शकता.

**तणाव कसा दूर करावा**

**१. मित्र-मैत्रिणींसोबत वेळ घालवा**

जेव्हा तुम्ही अस्वस्थ असता तेव्हा मनात अनेक प्रकारची नकारात्मकता येऊ लागते, हे टाळण्यासाठी तुम्ही तुमच्या मित्र-मैत्रिणींसोबत जास्तीत जास्त वेळ घालवला तर मन हलके होते आणि तणाव दूर होण्यास मदत होते.

**२. तुमचा दिनक्रम बदलू नका**

तुमचं सगळं वेळेत असेल तर दिनक्रम खाणं, पिणे आणि झोपेची वेळ बदलू नका. अनेकदा तणावादरम्यान आपल्याला काहीही करावेसे वाटत नाही, परंतु जर आपण दिनचर्या पाळली तर आरोग्य बिघडणार नाही आणि हळूहळू ताणही नाहीसा होईल.

**३. आवडत्या गोष्टी करा**

नैराश्य टाळायचे असेल तर आवडत्या ठिकाणी प्रवास, चित्रपट पाहणे, आवडते पदार्थ खाणे, क्रिकेट, फुटबॉल खेळणे अशा गोष्टी करत राहा यामुळे तणाव सहज दूर होऊ शकतो.

**(येथे दिलेली माहिती घरगुती उपचार आणि सामान्य माहितीवर आधारित आहे.)**

## निवडक

### शिवगाव बंधारा नूतनीकरणाचे उद्‍घाटन



**रेवदंडा** : जेएसडब्लू फाउंडेशनमार्फत तळेखार ग्रामांचायात हद्दीत शिवगाव येथे बंधारा नूतनीकरणाच्या कामाचे शनिवारी (दि. ५) उद्‍घाटन करण्यात आले. कंपनीच्या सीएसआर विभागाच्या माध्यमातून तलेखार ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार शिवगाव येथे बंधारा नूतनीकरणाचे काम करण्यात आले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून कंपनीचे अधिकारी प्रवीण बंन्सल, राम मोहिते, राकेश चवरकर, प्रतिभा ठाकूर, डब्ल्यूओटीआर टीम अधिकारी अशोक, संगम, तळेखार ग्रामपंचायतीच्या सरपंच निर्मला वाघीलकर, गाव अध्यक्ष हरिश्चंद्र काटकर, पांडुरंग घाणेकर, गोविंद घाणेकर आदी उपस्थित होते.

### उतेखोलवाडी शाळेत वह्यावाटप



**माणगाव** : खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त राजिप शाळा उतेखोलवाडी येथील विद्यार्थ्यांना शनिवारी (दि. ५) राष्ट्रवादी काँग्रेसमार्फत महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे व कोकण स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषदेचे आमदार अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातून वह्यावाटप करण्यात आले. या वेळी माजी उपनगराध्यक्ष संदिप खरंगटे, नगरसेविका रश्मी मुंढे, सेवानिवृत्त शिक्षक सुधाकर पालकर, नामदेव डवले, नामदेव खराडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा दिप्ती मुंढे, शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षक वर्ग, पालक उपस्थित होते.

### विघवली हायस्कूलमध्ये वक्तृत्व स्पर्धा



**माणगाव** : तालुक्यातील विघवली विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे विघवली विभाग हायस्कूल विघवली येथे लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेचे अध्यक्ष स्थान संस्थेचे अध्यक्ष महादेवराव बक्कम यांनी भूषविले. मुख्याध्यापक वि. वि. पारकर, शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते. या स्पर्धेत लहान गटात प्रथम गार्गी शेपुंडे (इयत्ता ६ वी), द्वितीय अपूर्वा सापळे (इयत्ता ७ वी), तृतीय रुई जंगम (इयत्ता ६ वी) तर मोठ्या गटात प्रथम सुयोग वारेकर (इयत्ता ९ वी) व जय दाखिनकर (इयत्ता ९ वी), द्वितीय समिधा बेंडखळे (इयत्ता ८ वी), तृतीय क्रमांक दर्शन मुंढे (इयत्ता ९ वी) यांनी यश संपादन केले.

### डॉ. सुधाकर लहुपचांग यांची नियुक्ती

**पाली** : महाराष्ट्र शासन व विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जमाती व भटक्या जमाती यांच्या आरक्षण



धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी, तसेच विविध कार्यक्रम व योजनांचे उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी योजना राबवणे इ. साठी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. रवींद्र कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली १५ सदस्य असलेल्या स्थायी समितीवर सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुधाकर लहुपचांग यांची नियुक्ती झाली. सुधागड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष वसंतराव ओसवाल, उपाध्यक्ष रवींद्र लिमये, कार्यवाह गीताताई पालरेचा, सचिव रविकांत घोसाळकर, सुएसोचे सर्व संचालक, उपविभागीय अधिकारी अरुण उंडे, तहसीलदार उत्तम कुंभार, प्राध्यापक, अनेक स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

### माणगाव येथून दुचाकीची चोरी

**माणगाव** : मोर्बा रोड येथील भवानी स्टीलसमोर दिनेश पवार यांच्या घराखाली पार्किंगमधून दुचाकीची चोरी झाल्याची घटना नुकतीच घडली. याबाबतची फिर्याद राहुल रमेश ढवळे (वय २५) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली. राहुल रमेश ढवळे यांची २५ हजार रुपये किमतीची होंडा कंपनीची शाईन गाडी (एमएच ०६ बीक्यु ७३९६) अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत.

# सैनिकांमुळे आपण शांतपणे श्वास घेऊ शकतोय

## सैनिक हो तुमच्यासाठी कार्यक्रमात ना. आदिती तटकरे यांची प्रमुख उपस्थिती

**माणगाव : प्रतिनिधी**

ज्या ज्या वेळी देशावर संकट येत त्या त्या वेळी भारतीय सैनिक नेहमी पुढे उभे असतात. सैनिकांसाठी प्रथम देश नंतर कुटूंब असत. सैनिक आपल्या कुटुंबाचा विचार न करता सीमेवर आपलं संरक्षणासाठी अहोरात्र मेहनत घेत असतात. त्याच्यामुळे आपलं स्वातंत्र्य टिकून आहे. सैनिकांमुळेच आपण शांतपणे श्वास घेऊ शकतो असे महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी शनिवारी (दि. ५) तहसील कार्यालय येथे झालेल्या सैनिक हो तुमच्यासाठी झालेल्या कार्यक्रमात प्रतिपादन केले.





ना. आदिती तटकरे यांच्या हस्ते हिरकणी कक्ष व तहसील कार्यालयात कामानिमित्त येणाऱ्यांसाठी अभ्यंगत कक्षाचे उद्‍घाटन करण्यात आले. या वेळी उपविभागीय अधिकारी संदिपान सानप, तहसीलदार विकास गारुडकर, अप्पर तहसीलदार, उपविभागीय पोलीस अधिकारी नितीनकुमार पोंदकुले, पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील, माजी सैनिक, सैनिक विरपत्नी, राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष सुभाष केकाणे, महिला तालुकाध्यक्षा संगीता बक्कम, महाड-माणगाव विधानसभा अध्यक्ष बाबूशेठ खानविलकर, माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक आनंद यादव, पंचायत समिती माजी सदस्य शैलेश भोनकर, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, उणेगाव माजी सरपंच राजेंद्र शिर्के, महिला आघाडी तालुका उपाध्यक्षा श्रद्धा यादव, विळे सरपंच गजानन मोहिते, शहर अध्यक्ष योगिता चव्हाण, इकबाल हर्णेकर, नगरसेवक व नगरसेविका, मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, आशावर्कर, अंगणवाडीसेविका आदी उपस्थित होते. देशासाठी बलिदान दिलेल्या माजी सैनिक वीर पत्नींचा प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

सैनिक सेवेत कार्यरत असलेल्या व सेवानिवृत्त झालेल्या माजी सैनिकांची कोणतीही कामे व अडचण असल्यास ती तत्काळ प्रामुख्याने सोडविण्यात येतील असे प्रांताधिकारी संदिपान सानप व तहसीलदार विकास गारुडकडर यांनी सांगितले. त्यांच्यासाठी कोणतेही प्रतीक्षा कक्ष नसेल त्यांनी थेट आमच्या दालनात येऊन आपल्या व्यथा सांगाव्यात त्वरित त्यांची कामे केली जातील. माणगाव येथे जीर्ण अवस्थेत असलेल्या सैनिक विश्रामगृहाच काम लवकरात लवकर करण्यात येईल, असे आश्वासनदेखील ना. आदिती तटकरे यांनी दिले.

## रोह्यात महसूल विभागातर्फे आजी, माजी सैनिकांचा सन्मान



**रोहे : प्रतिनिधी**

महसूल सप्ताहानिमित्त तहसील कार्यालयात आजी, माजी सैनिकांसाठी सैनिक हो तुमच्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी माजी सैनिकांचा उपविभागीय अधिकारी ज्ञोश्वर खुटवड, तहसीलदार रोहा डॉ. किशोर देशमुख व अप्पर तहसिलदार प्रकाश म्हेत्रे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उपस्थित सैनिकांनी आपले अनुभव कथन केले.

उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी माजी सैनिक यांच्याशी संवाद साधून माजी सैनिकांचे प्रश्प समजावून घेतले. माजी सैनिकांच्या कामास प्रशासनाच्या वतीने प्राथमिकता देण्याची ग्वाही दिली. देशाच्या संरक्षणासाठी सैनिकांच्या योगदानाबद्दल प्रशासन कायमच कृतज्ञ आहे, अशी भावना व्यक्त केली. माजी व आजी सैनिकांच्या कुटुंबीयांना कशा पद्धतीने मदत करता येईल याविषयी आढावा घेतला. वीरपत्नी सुप्रिया किरण सावंत यांस साडी, चोळी, श्रीफळ, गुलाबपुष्प देऊन विशेष सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन माजी सैनिक तथा मंडळ अधिकारी रोहा भरत सावंत यांनी केले. या कार्यक्रमात माजी सैनिक तथा सेवानिवृत्त आरएफओ वसंत धामणे, माजी कॅप्टन रोहिदास राजवाडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास तलाठी सचिन काटे, व कार्यालयीन कर्मचारी माजी सैनिक वसंत धामणे, तुकाराम माने, रोहिदास राजीवडे, नितीन सावंत, अंकुश साळुंखे, शरद महाडिक, तुकाराम कदम, भास्कर कदम, सहदेव मंडे, प्रदीप सुतार, वसंत पावलेकर, प्रदीप बैकर, हेमंत कुमार ठाकूर, प्रवीण शिर्के, सूर्यकांत पवार आदी उपस्थित होते.

## नसरापूर ग्रामपंचायतीतील कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील नसरापूर ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच तसेच कार्यकर्त्यांनी आमदार महेंद्र थोरवे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला.



नसरापुर माजी उपसरपंच भरत देशमुख यांच्यासह कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. या वेळी तालुका प्रमुख संभाजी जगताप, तालुका संघटक सुनील रसाळ, तालुका सहसंपर्कप्रमुख हर्षद विचारे, उपतालुका प्रमुख मिलिंद विरले, उपतालुका संघटक संतोष कोळंबे, उपतालुका संपर्कप्रमुख सतिष पवाळी, जि. प. गटाचे विभागप्रमुख प्रफुल्ल म्हसे, सहसंपर्क प्रमुख उत्तम तिखंडे, पंचायत समिती विभाग प्रमुख संतोष मोहिते, देविदास बागडे आदी उपस्थित होते.

## नागोठण्यात तरुणाची आत्महत्या की हत्या?

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कुहिरे गावाच्या परिसरात झाडाच्या फांदीला नायलॉन दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन यशवंत रामा मरगळा (वय २५, रा. विराणी, पो. सावरसई, पेण) या युवकाने आत्महत्या केली. ही घटना शुक्रवारी (दि. ४) सकाळी घडली.



कुहिरे गावाच्या हद्दीत मोठ्या झाडाला एका युवकाचा मृतदेह लटकत असलेला शुक्रवारी सकाळी ९ ते ९.३० वाजण्याच्या दरम्यान येथे गस्त घालीत असलेल्या सुरक्षारक्षकाच्या निदर्शनास आले. त्याने तत्काळ नागोठणे पोलिसांना या घटनेची माहिती दिली. सहाय्यक पोलीस निरीक्षक संदिप पोमन यांच्यासह सहाय्यक उपनिरीक्षक प्रमोद कदम, संदेश सानप, ब्रिजेश भायदे, विनोद पाटील, गणेश भोईर, नयन रसाळ, चालक महाले यांनी घटनास्थळी पोहचत परिस्थितीचा आढावा घेतला. मृत यशवंत याचे दोन्ही हात दोरीने बांधल्याचे निदर्शनास आले. मृतदेह शवविच्छेदनासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात आणण्यात आला. या ठिकाणी मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले असून काही महत्त्वाचे नमुने अधिक तपासणीसाठी मुंबई येथील जे. जे. रुग्णालयात पाठविण्यात येणार असल्याचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक प्रमोद कदम यांनी सांगितले. या तरुणाचे दोन्ही हात बांधले असल्याने नक्की त्याने आत्महत्या केली की, काही घातपात झाला आहे, या दिशेनेही पोलीस तपास करीत आहेत.

### निवी येथील तरुण बेपत्ता

**धाटाव :** रोहे शहरापासून जवळ असलेल्या वरसे हद्दीतील निवी बौद्धवाडी येथील १९ वर्षीय तरुण घरात कोणाला काही न सांगता निघून गेला आहे. सनील सुरेश पवार असे बेपत्ता तरुणाचे नाव असून उंची पाच फूट अंगाने सडपातळ, चेहरा उभट, रंगाने सावळा, केस कुरळे, बारीक नाक, ग्रे शर्ट व पॅन्ट सोबत मोबाईल आहे. तरुण कोणाला आढळून आल्यास त्यांनी (०२१९४-२३४९३३), मोबाईल (७२७६८४३३४३) या क्रमांकवर संपर्क साधावा, असे आवाहन रोहा पोलिसांनी केले आहे.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

### (हक्कसोड पत्राबाबत)

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाकरीता संपादित होणाऱ्या खालीलप्रमाणे नमूद जमिनीच्या साडेबावीस टक्के योजनेंतर्गत वाटप करण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | युनिट / निवाडा क्र. | सर्व्हे क्र./ हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र | सद्यस्थितीतील भूधारकांची नावे | क्षेत्र (चौ.मी.) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४८+६७ | ५२/४, १७/३ब, १८/१/१, २१/९ | १-१०-०८ हे.आर. + ०-४६-०० हे.आर. | १) श्रीमती जानुबाई गणु घरत<br>२) श्री. कृष्णा गणु घरत<br>३) श्री. बबन गणु घरत<br>४) श्री. भरत गणु घरत | ९१०.०० चौ.मी. | भूखंड क्र.८८, से.०८ क्षेत्र-९१०.०० चौ.मी. या भूखंडाचे वाटप दि. २०/१०/२०१५ रोजी करण्यात आले असून भाडेपट्टा करारनामा दिनांक - २१/१२/२०१७ रोजी झालेला आहे. |

दिनांक ०३/०६/२०१५ रोजीच्या संगणकीय सोडतीमध्ये भूखंड क्र.८८, सेक्टर-०८, क्षेत्र-९१०.०० चौ.मी. हा भूखंड पुष्पक नगर दापोली येथे वाटपित करण्यात आलेला आहे. करारनामा दिनांक २१/४/२०१७ रोजी करण्यात आला आहे. खालील तक्त्यामध्ये हक्क सोडणारे व हक्क प्रदान करणारे नमूद करण्यात आले आहेत :

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तिचे नाव | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिंची नावे |
|---|---|
| श्रीमती जानुबाई गणु घरत- मूळ वाटपदार | १) श्री. कृष्णा गणु घरत<br>२) श्री. बबन गणु घरत<br>३) श्री. भरत गणु घरत |

उपरोक्त दाव्यामधील (हक्कसोड) नुसार सिडकोकडून केवळ खालील व्यक्तिंच्या नावांची भाडेपट्टेदार म्हणून नोंद घेण्यात येईल.

१) श्री. कृष्णा गणु घरत
२) श्री. बबन गणु घरत
३) श्री. भरत गणु घरत

उपरोक्त हक्कसोडपत्र विचारात घेऊन ज्यांनी करारनामा करण्यात आलेल्या भूखंडामधील हक्क व हितसंबंध सोडून दिलेले आहेत त्यांची नावे वगळून जे हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत. अशा व्यक्तींच्या नावे सिडकोकडून नोंद घेण्यात येईल. आजच्या तारखेपासून ३० दिवसांत कोणत्याही दिवशी देण्याचे प्रस्तावित आहे.

वरील भाडेपट्टा करारनामा करण्यात आलेल्या भूखंडा संदर्भात वर नमूद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभांत हक्क व अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत, त्या भूधारकांना सदर योजनेनूसार यापुढे साडेबावीस टक्के योजनेंतर्गत लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत/तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायालयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करुन सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतींसह **अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नमुंआंवि) विभाग,** तळ मजला, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४, यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमूद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजुन वरील भाडेपट्टा करारनामा करण्यात आलेल्या भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**अति. भूमी व भूमापन अधिकारी (नमुंआंवि)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/२३०/२०२३-२४


## जनसंवाद कार्यक्रमात मुरूडकरांनी मांडल्या समस्या

**मुरूड : प्रतिनिधी**

महसूल सप्ताहाचे औचित्य साधून मुरूड दरबार हॉल येथे तहसीलदार रोहन शिंदे यांच्या उपस्थितीत जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या वेळी पंचायत समिती विस्तार अधिकारी सुभाष वाणी, कृषि अधिकारी मनिषा भुजबळ, नगर परिषद प्रशासकीय अधिकारी परेश कुंभार, मंडळ अधिकारी खुषाल राठोड, तलाठी रुपेश रेवसकर, शिवसेना उपजिल्हाप्रमुख भरत बेलोसे, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष मंगेश दांडेकर, माजी तहसीलदार नयन कर्णिक, राष्ट्रवादी चिटणीस विजय पैर, शिवसेना नेते दिनेश मिणमिणे, महिला संघटक शुभांगी करडे, प्रवाशी संघटना अध्यक्ष श्रीकांत सुर्वे, माजी नगरसेवक आशिष दिवेकर, माजी सभापती खेडेकर, शिवसेना नेते निलेश घाटवल, शिवसेना उपतालुकाप्रमुख मनोज कमाने, भाजप शहर अध्यक्ष उमेश माळी, राष्ट्रवादी तालुका निरीक्षक फैरोज घलटे आदींसह नागरिक उपस्थित होते.

तहसीलदार रोहन शिंदे यांनी, नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन व त्या समस्या दूर करण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमात ई-पीक पाहणी, ई-हक्क, लक्ष्मीमुक्ती योजना, संजय गांधी निराधार योजना, विशेष पूनर्निरीक्षण कार्यक्रम याबाबत उपस्थित नागरिकांना माहिती देण्यात आली, तसेच त्यांच्या विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली.

आपल्या समस्या मांडल्यावर शासकीय अधिकाऱ्यांकडून समाधानकारक उत्तरे देण्यात आली.


## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ४६/२०२३-२०२४ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | नागोठाणे आयपीसीएल (आरआयएल) औद्योगिक क्षेत्र पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. नागोठणे जलशुद्धीकरण केंद्रातील फिल्टर बेडसाठी ड्रेनिंग सिस्टीमचे आयसोलेशन उपकरण बदलणे. (दुसरी मागणी) | ₹ ३९,८८,४९६.०० |

उपरोक्त कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक ०७/०८/२०२३ ते दिनांक १७/०८/२०२३ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामाबाबत दिनांक ०९/०८/२०२३ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १०/०८/२०२३ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

## निवडक

### वृद्ध मातेसह मुलगा बेपत्ता

**पनवेल :** ६० वर्षीय वृद्ध मातेसह ३१ वर्षीय मुलगा कळंबोली



वसाहतीतील राहत्या घरातून कोठेतरी निघून गेल्याने ते दोघे जण हरविल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. संतोषीदेवी शंकरलाल रांका (वय ६०) रंग गोरा, चेहरा गोल, नाक सरळ, कपाळाला लाल बिंदिया, कानात कर्ण फुले, डोळ्यावर चष्मा, हातामध्ये बांगड्या आहेत सोबत त्यांचा मुलगा आशिष शंकरलाल रांका उर्फ मोटू (वय ३१) रंग सावळा, चेहरा उभा, केस काळे पांढरे, समोर थोडे टक्कल पडलेले, दाढी बारीक, नाक सरळ, डोळे काळे असून गळ्यात धागा आहे सोबत कपड्याची बॅग, मोबाईल आहे. दोघे राहणार साईधाम सोसायटी कळंबोली येथील आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास कळंबोली पोलीस ठाणे (०२२-२७४२३०००) किंवा पोलीस नाईक सचिन हराळे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### करंजाडे गावातून तरुणाचे अपहरण

**पनवेल :** पनवेलजवळील करंजाडे गाव येथे राहणाऱ्या एका



तरुणाचे तो घरी एकटा असताना कोणी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी त्याचे कायदेशीर राखवलीतून अपनयन केल्याची तक्रार त्याच्या मोठ्या भावाने पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली आहे. दीपककुमार शिवनाथ शहा रंग सावळा, उंची अंदाजे पाच फूट पाच इंच, अंगाने सडपातळ, चेहरा उभट, डोळे काळे, नाक सरळ असून त्याच्या अंगात लाल रंगाचा हाफ बाह्यांचा टी-शर्ट व काळ्या रंगाची जीन्स पॅन्ट घातलेली आहे तसेच त्याला हिंदी भाषा अवगत आहे. या तरुणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक किरण वाघ (९९७०१८९२९८) संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### मोहोपाडा मंदिरात धार्मिक कार्यक्रम

**मोहोपाडा :** श्री साई मंदिर मोहोपाडा रसायनी येथे सालाबादप्रमाणे श्रावण महिन्यातील प्रत्येक गुरुवारी (दि. १७, २४, ३१) या रोजी सामुदायिक सत्यनारायणपूजा श्री साई बाबा मंदिर रसायनी येथे आयोजित केल्या आहेत. पूजेकरिता देणगी मूल्य ५०१ आहे. वेळ सकाळी ९ ते १२:३० असून पुजा साहित्य मंदिराकडून देण्यात येणार आहे. ज्या भक्तांना या पूजेमध्ये सहभागी व्हायचे असेल त्यांनी आपली नावे मंदिरातील पुजारी/विश्वस्त यांचेकडे नोंदवावीत, असे आवाहन श्री साईबाबा सत्संग केंद्राचे अध्यक्ष एम.एस.मगर (९९६०९४०२४४), उपाध्यक्ष जयवंत आंबवणे (९८५०७५७१२१) यांनी केले आहे.

### आदिवासी विद्यार्थ्यांना स्कूलकिट



**पनवेल :** श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय रिटघर येथे शनिवारी शाळेतील गरीब व गरजू (आदिवासी) १२० विद्यार्थ्यांना स्कूलकिटचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमावेळी उत्सव युवारंभ फाऊंडेशन, मुंबई यातील मनोज शाह, अमिश शेठ, बीना शेठ हे सदस्य उपस्थित होते. वह्या, कंपास, पेन्सिल, बॉक्स, पट्टी, पेन, रबर या साहित्याचे वाटप केले. या वेळी मनोज शाह यांनी आपले मनोगत व्यक्त केले. रमेश अमृतलाल मेहता यांनी या कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य केले. सूत्रसंचालन ए. ए. पाटील, प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक बी. बी. साळुंखे व आभार एन. आर. पाटील यांनी मानले.

# 'करंजाडेच्या विकासासाठी भाजप सदैव प्रयत्नशील'

**पनवेल : प्रतिनिधी**

करंजाडेमधील विविध प्रकारच्या समस्येवर आम्ही प्रयत्नशील आहोत व समस्या मार्गी लावण्यासाठी सतत पाठपुरावा करत आहोत. ग्रामपंचायत निवडणुकीत आपण आमच्यावर दाखवलेला विश्वास आम्ही नक्कीच सार्थ करून दाखवू, असा विश्वास भारतीय जनता पक्षाचे करंजाडे शहर अध्यक्ष मिरेंद्र शहारे यांनी व्यक्त केला

करंजाडे मधील विविध प्रकारच्या समस्यांबाबत नागरिकांशी बोलताना त्यांनी रस्त्याची समस्या बिकट आहे त्यावर वारंवार सिडकोकडे मागणी केली असता नवीन रस्त्यांचे कंत्राट काढले असुन पावसाळ्यानंतर त्याचे काम सुरू होईल, सदरचे कंत्राट ३० टक्क्यांखाली घेतल्याने तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने उशीर होत आहे. खड्डे भरण्याच्या कामात दिरंगाई व मोठा गोंधळ झाला हे मान्य करावे लागेल त्यावर अनेकदा निवेदने देऊन पाठपुरावा करून ही सिडकोकडून दुर्लक्ष करण्यात आले. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आम्ही शहरातील रस्त्यांचे खड्डे भरण्याचे प्रयत्न केले त्यासाठी सिडकोकडे एनओसी मागितली ती नाकारण्यात आली. त्यामुळे सिडकोकडे पाठपुरावा करून खड्डे भरण्याचे काम करण्यात येत आहे.

सहा महिन्यांत ग्रामपंचायतच्या अखत्यारीतील अनेक कामे करण्यात आली त्यात गणेशनगर ते टाटा पावरचा रस्ता, सेक्टर ६ शिव मंदिर रस्ता, स्मशानभूमीचा रास्ता, आदिवासी भागातील रस्ते, गटारे, शौचालय यांची कामे. करंजाडे गावाकरिता पाण्याचे दोन कनेक्शन अशाप्रकारची अनेक कामे पूर्ण करण्यात आली, करंजाडे शहरासाठी सुद्धा विविध प्रकारच्या कामांचे नियोजन आहे. गार्डन, खेळाचे मैदान, समाजमंदिर, तलाव सुशोभीकरण ही कामे सिडकोकडे प्रक्रियेधीन आहेत पुढील काही महिन्यात नक्कीच कामे सुरू होतील.आमच्यावर दाखवलेला विश्वास आम्ही नक्कीच सार्थ करून दाखवू. ज्याप्रमाणे यशाचे श्रेय आम्ही घेतो तसेच अपयशाची जबाबदारी सुद्धा आमचीच असेल, असे त्यांनी या वेळी सांगितले

## माडभुवनवाडी पुन्हा गजबजली



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

आपटा ग्रामपंचायत हद्दीतील माडभुवन ही आदिवासीवाडी डोंगराच्या पायथ्यालगत वसलेली आहे. अतिवृष्टीमुळे डोंगर कधीही खचून खाली येऊ शकतो, म्हणून माजी जि. प. सदस्य ज्ञानेश्वर घरत, तहसीलदार विजय पाटील, गटविकास अधिकारी संजय भोये आणि वन विभागाचे अधिकारी काटकर यांनी पाहणी केली. या वेळी तत्काळ निर्णय घेऊन जवळच असलेल्या गारमेंटच्या रिकाम्या इमारतीत वाडीतील सर्व ग्रामस्थांचे सुरक्षित स्थलांतर केले. यादरम्यान स्थानिक आमदार महेश बालदी यांनी स्थलांतरित ग्रामस्थांना प्रत्यक्ष भेट देऊन वाडीचे सुरक्षित जागेवर पुनर्वसन करण्यासाठी आवश्यक असणारी प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले होते.

ग्रामस्थांसमवेत नवीन जागेचा शोध घेऊन आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता केली आणि वरिष्ठ प्रशासनाला सादर केले. गेले पाच-सहा दिवस जिल्ह्यामध्ये पावसाचा जोर कमी झाल्यामुळे तसेच हवामान खात्याकडून कोणताही अलर्ट जारी न केल्यामुळे आपत्ती व्यवस्थापन समितीने माडभुवन येथील स्थलांतरित ग्रामस्थांना पुन्हा आपल्या वाडीत राहत्या ठिकाणी जाण्यास सांगितले तेथे राहत असताना सतर्क राहण्याच्या सूचना प्रशासनाने ग्रामस्थांना दिल्या तसेच यापुढे कधीही अतिवृष्टीचा धोका असेल त्यावेळेला तत्काळ सध्या स्थलांतरित केलेल्या जागेवर येण्याच्या सूचनादेखील प्रशासनाने या वेळी दिल्या त्यानुसार सर्व ग्रामस्थांना त्यांच्या राहत्या वाडीत हलविण्यात आले.

या वेळी माजी जि. प. सदस्य ज्ञानेश्वर घरत, मंडळ अधिकारी तुषार काकडे, तलाठी एस. टी. तवर, ग्रामसेविका वैशाली जाधव, माजी सरपंच दत्ता पाटील, रत्नाकर घरत, राजू देशमुख ग्रामपंचायत सदस्य पांडुरंग लेंडे, स्थलांतरित ग्रामस्थ उपस्थित होते.

## १०१ मुलींचे सुकन्या समृद्धी योजना खाते उघडण्याचा संकल्प

**पनवेल : प्रतिनिधी**

आमदार प्रशांत ठाकूर यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्याचबरोबर यानिमित्ताने जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांनी १०१ मुलींचे सुकन्या समृद्धी योजनेचे खाते उघडून त्यात पहिला हप्ता म्हणून एक हजार रुपये भरण्याचा संकल्प केला. या माध्यमातून त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना जन्मदिवसाच्या अनोखी भेट दिली.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून आनंदोत्सवात सहभाग नोंदवला. शनिवारी ५ ऑगस्ट रोजी पनवेलच्या आमदारांचा वाढदिवस विविध समाजोपयोगी उपक्रम राबवून साजरा करण्यात आला. या निमित्ताने शिवसेनेच्या



कळंबोली येथील मध्यवर्ती कार्यालयात सायंकाळी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यानिमित्ताने जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांनी १०१ मुलींचे सुकन्या समृद्धी योजनेचे दायित्व स्वीकारले. त्यांच्या खात्यामध्ये प्रत्येकी एक हजार रुपये डिपॉझिट करण्याचा संकल्प केला.

या कार्यक्रमाला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, युवा मोर्चाचे मयुरेश नेतकर, भाजपचे कळंबोली शहराध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक राजेंद्र शर्मा, शिवसेनेचे शहर प्रमुख तुकाराम सरक यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रेल्वे स्टेशन परिसरात मृतदेह

**पनवेल : वार्ताहर**

रेल्वे स्टेशन परिसरातील आमराई रोडवर एका कच्या झोपडीत एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

मयत व्यक्तीचे अंदाजे वय ४५ ते ५० वर्ष, अंगाने सडपातळ, डोक्याच्या समोरील भागावर टक्कल व आजूबाजूला काळे केस, मिशी काळी पांढरी, पाच फूट अंदाजे, वर्ण सावळा, चेहरा उभट असून अंगात लाल फुल बाह्यांचा शर्ट व काळी फुल पॅन्ट घातलेली आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्नील केदार यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.




**उरण : चिरनेर ग्रामपंचायतीजवळ उभारण्यात आलेल्या श्री महागणपती प्रवेशद्वाराचे उद्घाटन उद्योजक पी. पी. खारपाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी उद्योगपती राजाशेठ खारपाटील, समीर खारपाटील, सागर खारपाटील आदी उपस्थित होते.**

## पनवेलमध्ये म्युझिक स्टुडीओ सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दि लेजंड किशोर कुमार यांच्या ९३ व्या जयंतीनिमित्त पनवेलमध्ये प्रथमच 'दि एट्थ नोट इंटरटेनमेंट' या लाईव्ह म्युझिक अ‍ॅण्ड कराओके स्टुडीओ सुरू झाला आहे. या स्टुडीओमुळे पनवेल आणि नवी मुंबईधील नवोदीत कलाकारांना हक्काचे रंगमंच उपलब्ध झाले आहे.

या स्टुडीओचे आर.एस बिल्डर्सचे डायरेक्टर सुनील खन्ना, पूजा खन्ना, लखानी बिल्डर्सचे मालक विशान लखानी, सीता लखानी यांच्या उपस्थितीत झाले. भारतीय संगीतातील किशोर कुमार हे एक अजरामर नाव आहे. बॉलिवूड इंडस्ट्रीमधील



संगीताचा इतिहास लिहायचा झाल्यास किशोर कुमार नावाचं स्वतंत्र प्रकरण नक्कीच लिहावं लागेल. त्यांच्या आवाजाने अनेकांच्या भावना व्यक्त झाल्या, म्हणूनच त्यांना भारतीय संगीताचा आत्मा म्हटलं गेलं. त्याच्या ९३ व्या जयंतीचे औचित्यसाधून पनवेल एस.टी.आगाराच्या मागे 'दि एट्थ नोट इंटरटेनमेंट' या लाईव्ह म्युझिक अ‍ॅण्ड काराओके स्टुडीओ राजेश रामगरीया यांनी सुरू केला आहे. त्यांच्या या स्टुडीओचे उद्घाटन आर.एस बिल्डर्सचे डायरेक्टर सुनील खन्ना यांच्या हस्ते आणि पूजा खन्ना, लखानी बिल्डर्सचे मालक विशान लखानी, सीता लखानी यांच्या उपस्थितीत झाले.

या वेळी उपस्थित मान्यवरांनी यावेळी उपस्थित कलाकारांनी आपली कला सादर करून किशोर कुमार यांना आपल्या गायनातून आदरांजली वाहीली. या वेळी स्टुडंचे प्रोपरायटर राजेश रामगरीया, व्हाईस ऑफ पनवेलचे विजेता तथा स्टुडीओचे डायरेक्टर रोनक रामगरीया, रोशन रामगरीया, रश्मी रामगरीया, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## खारघर येथील आश्रमात अन्नदान

**खारघर : रामप्रहर वृत्त**

कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवाभावी उपक्रम राबविण्याचे आवाहन केलेले होते. त्या आवाहनाला प्रतिसाद देत पनवेल महापालिकेचे माजी प्रभाग समिती सभापती व खारघर प्रभाग क्रमांक ०४चे माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील व भाजप युवा नेते नितेश पाटील यांच्या वतीने खारघर सेक्टर १४ येथील जीवन ज्योती आश्रममध्ये अन्नदान करण्यात आले.

या वेळी काशिनाथ घरत, शनिवार म्हात्रे, संदीप धमाल, विशाल सानप, गणेश राठोड, गहिनाथ नावडेकर, रोहिदास पाटील, निकेश पाटील, अतुल पाटील, मंगेश पाटील, ऋषिकेश म्हात्रे, मयुर घरत, प्रवीण पांडे, बंटी ढाकसे, सोमनाथ पाटील, धर्मा पाटील आदी उपस्थित होते.



## गरीब, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यासह चॉकलेटचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त प्रभाग क्रमांक १७मधील शिवाजी नगर वसाहत एसटी डेपोच्या बाजूला पनवेल येथे शिवाजी नगर वसाहत येथील शाळेतील गरीब, गरजू विद्यार्थ्यांना वह्या, पेन्सिल, पट्टी, खोडरबर आणि चॉकलेट वाटप करण्यात आले.

या वेळी भाजप युवा कार्यकर्ते राजू बगाटे, ज्येष्ठ कार्यकर्ते संजय जाधव, भाजप उत्तर रायगड जिल्हा झोपडपट्टी सेल संयोजक राहुल वाहुळकर, भाजप अनुसूचित जाती मोर्चा पनवेल तालुका उपाध्यक्ष व बूथ कमिटी ४२८चे अध्यक्ष रावसाहेब खरात, भाजप कार्यकर्ते दीपक वाहुळकर, अमोल लहाने, अनंत वाहुळकर, विजय वाहुळकर, अनंत पवार, गोविंद येडे,गोरख खवले, गुलाब बागवान, सन्नी वाहुळकर, गणी बागवान आणि शिवाजी नगर युवक मित्र मंडळाचे कार्यकर्ते आदी उपस्थित होते.



## रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचा स्थापना दिन उत्साहात साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयाचा १४वा स्थापना दिन रविवारी (दि. ६) स्टाफ वेल्फेअर समितीतर्फे उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

या महाविद्यालयाची स्थापना ६ ऑगस्ट २०१० रोजी रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल सेक्टर १९ येथे झाली. २०१० साली या महाविद्यालयात अकाउंट व फायनान्स, माहिती तंत्रज्ञान तसेच कम्प्युटर सायन्स असे फक्त तीन विभाग होते व त्या वेळची तिन्ही विभागांतील विद्यार्थी संख्या अवघी ५१ होती. त्यानंतर सर्वांच्या सहकार्यामुळे प्रत्येक वर्षी विद्यार्थी संख्या वाढत गेली. आज महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या ११५० इतकी आहे तसेच महाविद्यालयाला भव्यदिव्य इमारत लाभली आहे. यामध्ये प्रामुख्याने प्रिन्सिपल कॅबिन, २५ वर्ग खोल्या, पाच प्रयोगशाळा, एक एडमिन ऑफिस, एक बोर्ड रूम, एक सेमिनार हॉल, एक स्टाफ रूम, एक जिमखाना, ग्रंथालय व अंतर्गत गुणवत्ता कक्ष रूम तसेच ३७ प्राध्यापक तसेच १७ शिक्षकेतर कर्मचारी आहेत.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड हे नेहमी महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करीत असतात. त्यांच्या नेतृत्वात वेगवेगळे सामाजिक, शैक्षणिक



व पर्यावरणीय उपक्रम राबविले जातात. महाविद्यालयाचा आजपर्यंतचा जो विकास झाला आहे याचे सर्व श्रेय संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हॉइस चेअरमन वाय. टी. देशमुख, संस्थेचे कार्यकारी संचालक परेश ठाकूर, सचिव डॉ. एस. टी. गडदे या सर्वांना जाते. या सर्वांचे नेहमी मोलाचे मार्गदर्शन मिळत असते.

स्थापना दिन कार्यक्रमात संस्थेचे सचिव डॉ. गडदे यांनी स्व. जनार्दन भगत, स्व. चांगू काना ठाकूर व स्व. भागुबाई चांगू ठाकूर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून महाविद्यालयाच्या स्थापनेविषयी तसेच महाविद्यालयाविषयी वेगवेगळ्या आठवणींना उजाळा दिला. त्याचप्रमाणे महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांना येणाऱ्या काळात शिक्षणात होणारे बदल व आव्हाने, प्राध्यापक म्हणून असणाऱ्या शैक्षणिक जबाबदाऱ्या याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे आयोजन स्टाफ वेल्फेअर समिती समन्वयक प्रा. प्रतीक्षा पाटील तसेच इतर सर्व सदस्य, महाविद्यालयातील सर्व विभागांतील प्राध्यापकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी मिळून केले व उपस्थिती दर्शवित सहकार्य केले.


### विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपक्रम

**महाविद्यालय मुंबई विद्यापीठाला संलग्नित आहे तसेच पनवेल तालुक्यासह नवी मुंबईतील एक नावाजलेले महाविद्यालय आहे. या महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, अध्ययन व अध्यापन व विस्तार विभाग, ट्रेनिंग अ‍ॅण्ड प्लेसमेंट, शास्त्र विभाग, माहिती तंत्रज्ञान, वाणिज्य, अकाउंट व फायनान्स या सर्व विभागांच्या माध्यमातून वेगवेगळे विषय व अभ्यासक्रम घेतले जातात तसेच सामाजिक, शैक्षणिक व पर्यावरणीय असे वेगवेगळे उपक्रम प्राध्यापकांसाठी तसेच समाजातील शोषित वंचित घटकांसाठी व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतले जातात.**

# निवडक

## आगरकोट तटबंदीच्या झाडांपासून धोका

**रेवदंडा** : रेवदंडा गावाचे वैभव असलेला आगरकोट



किल्लातून गावातील मुख्या रस्तावर वाहनाची जा-ये सुरू असते. कुंडलिका समुद्रखाडी पुलावरून येताना समोर तटबंदीवर वृक्ष वाढला आहे. या वृक्षाच्या फांद्या मुख्य रस्त्याच्या बाजूने पसरल्या असून अपघातास निमंत्रण देत आहेत. त्यामुळे चालकांना कसरत करावी लागत आहे. या ठिकाणी अपघात होण्याआधी संबंधित विभागाने फांद्यांची छाटणी करावी, अशी मागणी वाहन चालकांमधून होत आहे.

## कर्जतमध्ये गार्डनचे सुशोभीकरण



**कर्जत** : रोटरी क्लब कर्जतच्या वतीने नगर परिषदेच्या माध्यमातून मोमीन गल्ली, अमीरा पॅलेसशेजारील नगर परिषद शौचालयाजवळील गार्डनचे नूतनीकरण व सुशोभीकरण करण्यात आले, तसेच या गार्डनाची देखभाल करण्याची जबाबदारी क्लबने घेत परिसर स्वच्छ करून विकसित केले आहे. रोटरीच्या सदस्यानी स्वच्छता व वृक्षारोपणाबाबत संदेश देण्यात आला. या वेळी उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, बांधकाम सभापती राहुल डाळिंबकर, स्थानिक नगर सेविका मधुरा चंदन, आरोग्य विभागाचे सुदाम म्हसे, रोटरी क्लब सचीव विशाल शहा, खजिनदार अरविंद जैन, पीआय डायरेक्टर सचिन ओसवाल, डॉ. प्रेमचंद जैन, हुसैन जमाली, योगेश राठी, दीपचंद जैन, डॉ. आदित्य जंगम, सुशांत ठकेकर, ॲड. जयेश म्हसे सचिन पटेल आदी उपस्थित होते.

## आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराला प्रतिसाद



**कर्जत** : कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयाच्या वतीने उन्नत भारत अभियानांतर्गत माजी आमदार तुकाराम स्व. सुर्वे प्रतिष्ठान, दादर-मुंबईतील ज्योविस आयुर्वेद, नारी सामाजिक संस्था यांच्या सहकार्याने फार्मसी महाविद्यालयात मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराचे आयोजन केले होते. १४९ रुग्णांची तपासणी करून त्यांना मोफत औषधे देण्यात आली. शिबिराचे उद्घाटन डॉ. राज सातपुते यांचे हस्ते झाले. या वेळी ज्योवीस आयुर्वेद हॉस्पिटलच्या डॉ. ज्योती सातपुते, प्राचार्य डॉ. मोहन काळे, आमदार स्व. तुकाराम सुर्वे प्रतिष्ठानचे मुकेश सुर्वे, मनीषा सुर्वे, विश्वनाथ कलवार आदी उपस्थित होते. या शिबिरात डॉ. राज सातपुते, डॉ. ज्योती सातपुते, डॉ. मणीशंकर गुप्ता यांच्यासह १५ डॉक्टर आणि १० आरोग्यसेवक यांनी आरोग्य सेवा दिली.

## भादाव येथून विवाहित बेपत्ता

**माणगाव** : भादाव गावातील आपल्या राहत्या घरातून विवाहित महिला बेपत्ता झाल्याची घटना २ ऑगस्ट रोजी घडली आहे. याबाबतची फिर्याद महिलेचा पती रमेश गोपाळ पवार (वय २७, रा. भादाव) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली. फिर्यादी रमेश गोपाळ पवार यांची पत्नी सुवर्णा गोपाळ पवार (वय २७) ही २ ऑगस्ट रोजी मध्यरात्री घरात काहीएक न सांगता निघून गेली आहे. तिच्या नातेवाईकांनी सर्वत्र शोध घेतल्यावर ती हरविल्याची तक्रार माणगाव पोलीस ठाण्यात दिली. तिचे वर्णन रंग सावळा, उंच सुमारे ५.५ फूट, अंगाने मजबूत, अंगात नेसूस पंजाबी ड्रेस तसेच पायात निळ्या रंगाची चप्पल व पैंजण, दोन्ही गालावर गोंदलेले आहे. याबाबत कोणाला माहिती असल्यास माणगाव पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



**माणगाव : भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांना माणगाव नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, भाजप शहराध्यक्ष नितीन दसवते, उपनगराध्यक्ष राजेश मेहता, जिल्हा युवा मोर्चा उपाध्यक्ष चिन्मय मोने यांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.** (छाया : सलीम शेख)

# पूरपरिस्थिती आटोक्यात आल्यावर काठांवर प्लास्टिक कचरा

## माणगाव परिसरात कचऱ्याची दुर्गंधी

**माणगाव : प्रतिनिधी**

गेले दोन आठवडे पावसाने सर्वत्र जोरदार वर्षाव केल्याने जिल्ह्यातील सर्व ओढे व नद्या यांना पूर आला होता. दोन दिवसांपासून पावसाने उसंत घेतली असून पावसाचे पाणी ओसरत आहे, मात्र या ओसरत्या पुरासोबत नदी, ओढे काठांवर, रस्त्यांवर कचऱ्याचे ढीग दिसत आहेत. त्यामुळे पर्यावरप्रेमींनी चिंता व्यक्त केली आहे.

नद्या या जलस्रोत आहेत. त्यांच्या काठावर पुराच्या पाण्याने प्लॅस्टिक कचरा मोठ्या प्रमाणात वाहून आला आहे. या वर्षी धुवांधार पडलेल्या पावसाने अनेकदा जनजीवन पूर्णतः विस्कळीत झाले होते. अनेक गावांतून, शहरांतून पुराचे पाणी



शिरले होते. या पाण्यासोबत गाव, शहरातील कचरा नद्या, नाल्यात वाहून आला आहे. पावसाळा कमी झाल्याने नद्या, नाल्यांचे काठ उघडे पडले आहेत. या उघड्या काठावर व झाडीत मोठ्या प्रमाणात प्लास्टिकचा कचरा अडकलेला दिसत आहे. याबाबत पर्यावरप्रेमींनी चिंता व्यक्त केली आहे.

### नागरिकांचे आरोग्य धोक्यात

पुराचे पाणी ओसरल्यानंतर नद्या, ओढ्यांच्या काठावर साचलेल्या कचऱ्यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. याबाबत त्वरीत उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

**पुरात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक वाहून आले आहे. आता पाणी ओसरल्यावर हा कचरा व प्लास्टिक दिसत असून यामुळे नद्यांची जैवविविधता धोक्यात येईल. प्रदूषणात वाढ होईल. पिण्याच्या पाणी यामुळे दूषित होईल.**
**-राहुल दसवते, पर्यावरणप्रेमी, माणगाव**

**पाऊस कमी झाल्याने पुराचे पाणी कमी होत आहे, मात्र नदीकाठी, ओढ्यात मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिक कचरा वाहून आल्याने काठ प्रदूषित झाले आहेत. हे दृश्य ओंगळवाणे असून याबाबत जनजागृती होणे गरजेचे आहे. नागरिकांनीही कचरा नदी, नाल्यांमध्ये टाकणे चुकीचे आहे.**
**-प्रा. हर्षल जोशी, निसर्गप्रेमी**

## मुरूड कोळीवाडा मच्छीमार्केट येथील रस्त्याची दुरवस्था

**मुरूड : प्रतिनिधी**

शहरातील कोळीवाडा मच्छीमार्केटजवळील रस्त्याची अक्षरशः चाळण झाली असून हा रस्ता वाहनचालकांना धोकादायक बनत आहे.



मुरूड पर्यटनक्षेत्र असल्याने ऐतिहासिक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी अनेक पर्यटक या रस्त्यावरुन ये-जा करीत असतात.हा रस्ता नगर परिषद हद्दीतील असला तरी हा रस्त्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे. अनेक वर्षांपासून या रस्त्याकडे दुर्लक्ष केल्याने आज ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत.हा रस्ता जागोजागी खड्डेमय झाल्याने चालकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी रमेश गोरे यांनी सांगितले की, कोळीवाडा मच्छीमार्केटजवळ खड्डे मोठे झाल्याचे वास्तव आहे. पावसाचे प्रमाण कमी झाले की, आमच्या स्तरावर कॉंक्रिटकरण करून खड्डे भरले जातील. आम्ही पाऊस थांबण्याची वाट पाहत आहोत.

## अलिबाग येथे पासपोर्ट सेवा केंद्राचा शुभारंभ

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील नागरिकांना पासपोर्ट काढायचा असल्यास, ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ठाणे कार्यालयात जावे लागत असे, मात्र भारतीय डाक विभाग व परराष्ट्र व्यवहार मंत्रालय यांच्या समन्वयाने डाकघर अलिबाग येथे पासपोर्ट सेवा उपलब्ध झाली आहे. या पासपोर्ट सेवा केंद्राचा शुभारंभ शनिवारी (दि. ५) खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते करण्यात आला.



रायगड जिल्ह्यातील असंख्य नागरिक, विद्यार्थ्यांना नोकरी, व्यवसाय व शिक्षणासाठी परदेशवारीला जाण्याची संधी मिळते. परदेशात जाण्यासाठी पासपोर्ट महत्त्वाचे आहे, मात्र हे पासपोर्ट काढण्यासाठी रायगडकारांना ठाणे रिजनल पासपोर्ट कार्यालयात जावे लागत असे. यामुळे रायगड जिल्ह्यात पासपोर्ट कार्यालय सुरू करण्याची मागणी सातत्याने करण्यात येत होती. या मागणीची दखल घेत शासनाने अलिबाग शहरातील जिल्हा डाकघर कार्यालयाच्या इमारतीलगत पासपोर्ट कार्यालय उभारण्याचा निर्णय घेतला होता. आता रायगडकरांना पासपोर्टसाठी इतरत्र कोठे जावे लागणार नाही.

या वेळी आमदार महेंद्र दळवी, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, पोस्ट विभगातील अधिकारी किशन शर्मा, ॲड. प्रविण ठाकूर, अमित नाईक उपस्थित होते.

## खालापुरात आढळला अनोळखी मृतदेह

**चौक** : खालापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील राष्ट्रीय महामार्ग क्र. ४वरील चारफाटा येथे जाहिरात फलकाजवळ एक अनोळखी मृतदेह आढळला आहे. पोलीस तपास सुरु असून याबाबत कुणास माहीत असल्यास पोलीस ठाण्यात माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मृत व्यक्ती ४५ ते ५० वर्षे वयाची असून उंची पाच फूट,. रंग सावळा, पांढरी दाढी वाढलेली, पांढरे केस, फुलांची डिझाईन असलेली हाफ पँट घातली आहे. याबाबत माहिती असल्यास उपनिरीक्षक युवराज सुर्यवंशी (९०११०३१५२३) अथवा शिपाई उघडा (८८०५३९५०९०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## महाडमध्ये विविध कार्यक्रमांद्वारे महसूल सप्ताहाला सुरुवात

**महाड : प्रतिनिधी**

राज्यात सर्वत्र महसूल दिन साजरा केला जात असून महाडमध्येही १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट या कालावधीत महसूल सप्ताह साजरा केला जात आहे. या निमित्ताने विविध कार्यक्रम आयोजित केले असून त्याची सुरुवात १ ऑगस्टला महाड तालुक्यात महसूल दिन साजरा करून करण्यात आली.

महाडचे प्रांताधिकारी डॉ. ज्ञानोबा बानापुरे यांच्या अध्यक्षतेखाली महाड तहसीलदार कार्यालयामध्ये करण्यात या वेळी महाडचे तहसीलदार महेश शितोळे, नायब तहसीलदार बाबासाहेब भाबड, महसूल नायब तहसीलदार सीमा कांदे व अव्वल कारकून प्रकाश भोईर महसूल विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. प्रारंभी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. महसूल आस्थापनेमधील गुणवंत कर्मचाऱ्यांचा या वेळी प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये अव्वल कारकून सहा, महसूल सहाय्यक पाच, तलाठी सहा, शिपाई



सहा, मंडळ अधिकारी चार, कोतवाल सहा यांचा प्रशस्तीपत्रक देऊन प्रांताधिकारी यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. सर्व उपस्थितांचे स्वागत अहवाल कारकून प्रकाश भोईर यांनी केले. तहसीलदार महेश शितोळे यांनी महसूल दिनाबाबतची यावेळी माहिती दिली. या वेळी सर्व कर्मचाऱ्यांनी कार्यालय तसेच कार्यालयातील आवारातील साफसफाई व स्वच्छता केली. तालुक्यातील प्रत्येक मंडळ स्तरावर व तलाठी सजा येथे सातबारा उतारा फेरफार नोंदी तसेच ई पीक नोंदी यांचे वाटप हे करण्यात आले. तालुक्यामध्ये विविध ठिकाणी वृक्षारोपणाचे कार्यक्रमदेखील पार पडले.

## अभिनव शिक्षक-पालक संघाच्या अध्यक्ष, उपाध्यक्षांची निवड

**कर्जत : प्रतिनिधी**

अभिनव ज्ञानमंदिरच्या शिक्षक-पालक संघाच्या अध्यक्षपदी मुख्याध्यापक सच्चिदानंद जोशी तर उपाध्यक्षपदी विलास श्रीखंडे यांची निवड करण्यात आली.



अभिनव ज्ञानमंदिर प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयातील २०२३साठी नियुक्त केलेल्या ५२ पालक प्रतिनिधींच्या संघाची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत पालक संघाच्या अध्यक्षपदी अभिनव ज्ञानमंदिर संस्थेचे मुख्याध्याक सच्चिदानंद जोशी, विलास श्रीखंडे उपाध्यक्षपदी, सचिवपदी नीता बारकडे, सहसचिवपदी भारती कांबळे यांची निवड झाली आहे.

बैठकीत शाळेतील समस्या, विद्यार्थी शिक्षक यामध्ये समन्वय, स्पर्धा परीक्षा तयारी, मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाबरोबरच विविध क्रीडा स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी मार्गदर्शन, शिक्षण कार्यपद्धती, सर्व शिक्षकांच्या अध्यापनातील सातत्य व त्यामुळेच या शाळेतील सातत्याने वाढणारा विद्यार्थ्यांचा बौद्धिक उचांक याबाबत चर्चा करण्यात आली.

या वेळी अभिनव ज्ञानमंदिर संस्थेचे उपमुख्याध्यापक योगेश्वर निकम, उपमुख्याध्यापिका सुनीता खडे, रंजना देशमुख, नीता बारगजे, सर्व शिक्षक, विश्वनाथ भोशीकर, विलास देशमुख, शरद ओव्हाळ, संजय ऐनकर यांसह पालक प्रतिनिधी उपस्थित होते.

**सध्याची स्पर्धेच्या युगातील गतिमान शिक्षण पद्धत, अगदी लहान वयातच शिक्षणाबरोबर पालकांकडून इतर क्षेत्रात मुलांना दिली जाणारी अधिकची जबाबदारी तसेच विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांचा शैक्षणिक स्थर वाढविण्यासाठी सातत्याने जर योग्य समन्वय असेल तर तो विद्यार्थ्यांना पुढील काळात निश्चितच दिशादर्शक ठरेल.**
**-विलास श्रीखंडे, उपाध्यक्ष, पालक संघ अभिनव ज्ञानमंदिर**

## स्वच्छता सर्वांनी अंगीकारली पाहिजे -तहसीलदार रोहन शिंदे

**मुरूड : प्रतिनिधी**

स्वच्छता राखणे हे सर्वांचेच कर्तव्य असून सर्वांनी अंगिकारायला हवी. स्वच्छतेची सुरुवात स्वतःपासूनच करणे गरजेचे असल्याचे मत तहसीलदार रोहन शिंदे यांनी महसूल सप्ताहाच्या अनुषंगाने आयोजित स्वच्छता मोहीम कार्यक्रमावेळी व्यक्त केले. स्वच्छतेला तहसीलदार कार्यालय ते कोटेश्वरी मंदिरापर्यंतचा परिसर स्वच्छ केला. साधारण तीन ते चार टन इतका कचरा जमा करण्यात आला.

या वेळी उपअधीक्षक भूमी अभिलेख मडके, उपविभागीय अधिकारी सर्जेराव सोनवणे, नायब तहसीलदार राजेश्री साळवी, परेश कुंभार, राकेश पाटील, नंदकुमार आंबेतकर, रूपेश रेवसकर विजय म्हापुस्कर, सतेज निमकर, प्रशांत दिवेकर, संजय वेटकोळी, अभिजीत चांदोरकर, चिंदानंद व्हटकर, संजय बामगुडे, कपिल वेहेले, राजु पाटील, छाया वरसोलकर, अक्षता तुळसकर, स्वप्नजा विरुकुड आदींसह नगर परिषद, महसूल कर्मचारी, युवकांनी सहभाग घेतला.

तहसीलदार रोहन शिंदे पुढे म्हणाले की, स्वच्छ सर्वेक्षणामध्ये अव्वल क्रमांक मिळेल या दृष्टीने काम करण्याबाबत आवाहन केले, तसेच शासनाच्या विविध लोक कल्याणकारी योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहचतील यासाठी काम करण्याबाबत सूचना केल्या. या वेळी प्रशासकीय अधिकारी परेश कुंभार व स्वच्छता निरीक्षक राकेश पाटील यांनी मेरी मिट्टी मेरा देश या अभियानाबाबत तसेच माझी वसुंधरा या अभियानाबाबत माहिती दिली.




## वाराणसीतील संमेलनात आशुतोष पाटीलचा सहभाग

**धाटाव : प्रतिनिधी**

जगभरातील मंदिरांचे आंतरराष्ट्रीय मंदिर महाअधिवेशन वाराणसी येथे नुकतेच झाले. या मंदिर संमेलनात युवानाद या पनवेल येथील ढोल पथकाला सादरीकरण करण्यासाठी निमंत्रित करण्यात आले होते. रोह्याचा आशुतोष महेंद्र पाटील हा युवक वाराणसीत गेलेल्या ढोल पथकात सहभागी झाला होता.

टेम्पल कनेक्ट या संस्थेने या मंदिर अधिवेशनाचे वाराणसी येथे आयोजन केले होते. जगभरातील ४३५ मंदिरांचे ७६७ प्रतिनिधी या अधिवेशनात सहभागी झाले होते. त्यामध्ये रोह्याच्या श्री धावीर महाराज देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त मकरंद बारटक्के आणि अमोल देशमुख सहभागी झाले होते. प्रथमेश सोमण यांच्या नेतृत्वाखालील ५० मुलांच्या या ढोल ताशा पथकामध्ये रोह्याच्या आशुतोष महेंद्र पाटीलचाही समावेश होता.

## डॉ. सी. डी. देशमुख महाविद्यालयात कार्यक्रम



**रोहे : प्रतिनिधी**

तहसील व कोकण एज्युकेशन सोसायटीचे डॉ. चिंतामणराव देशमुख वाणिज्य व सौ. कुसुमताई ताम्हाणे कला महाविद्यालय निवडणूक साक्षरता क्लब, राष्ट्रीय सेवा योजना व आजीवन अध्ययन व विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या सभागृहात महसूल सप्ताहानिमित्त प्रबोधनपर कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात २२५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल साळुंके यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला असून या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून परिवेक्षाधीन तहसीलदार प्रज्ञा काकडे, अव्वल कारकून स्वाती चावरेकर, पिंगळसई तलाठी कविता म्हासेलकर, महाविद्यालयाचे इतिहास विभाग प्रमुख प्रा. तुळशिदास मोकल, अर्थशास्त्र विभाग प्रमुख शत्रुघ्न लोहकरे, प्रा. सुकुमार पाटील, भूगोल विभाग प्रमुख डॉ. अनिल शिंदे, प्रा. सीमा भोसले, प्रा. अनंत थोरात वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. कमलाकर कांबळे, डॉ.सम्राट जाधव, प्रा. वैशाली कानावडे, प्रा. अंकिता जैन आदी उपस्थित होते.

परिवेक्षाधीन तहसीलदार प्रज्ञा काकडे यांनी, जातीचे दाखले, उत्पन्नाचे दाखले एक दिवस कॅम्प लावून विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देवू असे सांगितले.

# साताऱ्याच्या कन्येचा जागतिक दबदबा

## सुवर्णपदक विजेत्या आदिती स्वामीचे सर्वत्र कौतुक

**बर्लिन : वृत्तसंस्था**

भारतीय तिरंदाज आदिती स्वामीने गेल्याच महिन्यात युवा जागतिक स्पर्धेत सुवर्ण यश मिळविल्यावर शनिवारी वरिष्ठ गटात कम्पाऊंडच्या वैयक्तिक प्रकारातही ऐतिहासिक सुवर्णपदक मिळवले. त्यानंतर आदितीवर सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

तिरंदाजीच्या एकाच जागतिक स्पर्धेत दोन सुवर्णपदके पटकाविण्याची भारताची ही पहिलीच वेळ ठरली. भारतीय महिला संघाने शुक्रवारीच सांघिक सुवर्णपदक मिळवले होते. त्यानंतर दुसऱ्या दिवशी आदिती पहिली आणि सर्वांत तरुण वैयक्तिक सुवर्णपदक विजेती ठरली.

सांघिक सुवर्णपदकानंतर वैयक्तिक प्रकारात खेळताना अंतिम फेरीत



१७ वर्षीय आदितीने मेक्सिकोच्या आंद्रेआ बेसेराचा १४९-१४७ असा पराभव केला. लक्ष्यभेदात असलेली कमालीची अचूकता हे आदितीच्या यशाचे वैशिष्ट्य ठरले. यामुळे आदितीने मेक्सिकोच्या तुल्यबळ आंद्रेआचा दोन गुणांनी सहज पराभव केला. जागतिक क्रमवारीत १६व्या स्थानावर असणाऱ्या आंद्रेआने उपउपांत्यपूर्व फेरीत गतविजेती सारा लोपेझचा पराभव केला होता. अंतिम फेरीत मात्र आंद्रेआला भारताच्या सहाव्या मानांकित आदितीने निष्प्रभ केले.

सातारा येथील रहिवासी असलेली आदितीने पहिल्या चार फेऱ्यात १२ अचूक वेध घेताना आंद्रेआवर तीन गुणांची आघाडी मिळवली होती. अखेरच्या पाचव्या फेरीत फक्त एकदाच आदितीचा तीर अचूक निशाणावर लागला नाही, पण तोवर आदितीने दुसऱ्या जागतिक सुवर्णपदकावर नाव कोरले होते. त्यापूर्वी, आदितीने उपांत्य फेरीत आपली आदर्श खेळाडू ज्योती सुरेखा वेन्नमचा १४९-१४५ असा पराभव केला होता. ज्योतीने तुर्कीच्या इपेक टोमर्कविरुद्ध अचूक १५० गुण मिळवून कांस्यपदक मिळवले. जागतिक स्पर्धेच्या तिसऱ्या अनुभवानंतर ज्योतीच्या नावावर आता एक सुवर्ण, चार रौप्य आणि तीन कांस्य अशी आठ पदके झाली आहेत.

**ओजस देवतळेचाही 'सुवर्ण'वेध**

आदिती स्वामी शनिवारी वयाच्या १७व्या वर्षी सर्वांत तरुण ज्येष्ठ विश्व चॅम्पियन बनली, जेव्हा तिने बर्लिन येथे जागतिक तिरंदाजी स्पर्धेत कंपाऊंड महिला सुवर्णासह भारताचे पहिले वैयक्तिक विजेतेपद पटकावले. त्यानंतर ओजस देवतळेदेखील १५०च्या अचूक स्कोअरसह कंपाऊंड पुरुषांचे विजेतेपद जिंकून जगज्ज्ञेते ठरला.



# पनवेलमधील सुकापूर येथे आमदार चषक स्पर्धा रंगली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल मतदारसंघाचे कार्यतत्पर व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांचा वाढदिवस शनिवारी (दि. ५) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. त्याचप्रमाणे सुकापूर येथे हार्ड हिटर्स यांच्या वतीने आमदार चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला आमदार प्रशांत ठाकूर आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत खेळाडूंना प्रोत्साहित केले.

सुकापूर येथील टर्फ क्रिकेट मैदानावर ही क्रिकेट स्पर्धा खेळली गेली. स्पर्धेत १६ संघांनी सहभाग घेतला. स्पर्धेवेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस व माजी नगरसेवक नितीन पाटील, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, माजी जि. प. सदस्य अमित जाधव तसेच हॅप्पी सिंग, रोशन ठाकूर, अभिषेक भोपी, सुमित झुंजारराव, प्रवीण मोरबाळे, आदित्य देशमुख, विजय शिंदे, दर्शन मनोरे, गौरव चव्हाण, अक्षय साखरे, विकी बागडे, अमेय देशमुख यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, खेळाडू व क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून १२ वर्षीय उदयनमुख खेळाडू पंकज इटकर याला त्याच्या क्रिकेट करियरसाठी आर्थिक मदत करण्यात आली.



# चॅम्पियनशिपदरम्यान रेसरचा अपघाती मृत्यू

**चेन्नई : वृत्तसंस्था**

वेगाच्या छंदाने १३ वर्षीय मुलाचा जीव घेतला आहे. मद्रास इंटरनॅशनल सर्किट येथे एमआरएफ एमएमएससी एफएमएससीआय इंडियन नॅशनल मोटरसायकल रेसिंग चॅम्पियनशिपमध्ये शनिवारी ही घटना घडली. या स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीदरम्यान झालेल्या अपघातात बंगळुरू येथील १३ वर्षीय प्रतिभावान रेसर कोपाराम श्रेयस हरीशचा मृत्यू झाला.

श्रेयस शनिवारी सकाळीच पोल पोझिशनवर पात्र ठरला होता. शर्यतीच्या सुरुवातीला टर्न-१मधून बाहेर पडताना श्रेयस अपघात झाला आणि त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यानंतर ट्रॅकवर उभ्या असलेल्या ट्रॉमा केअर रुग्णवाहिकेतून त्याला तातडीने जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले, मात्र तेथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. श्रेयसने १० दिवसांपूर्वीच त्याचा १३वा वाढदिवस साजरा केला होता.

**चेन्नईतील घटना**

या दुःखद घटनेनंतर स्पोर्ट्स क्लब या कार्यक्रमाच्या प्रवर्तकांनी उर्वरित कार्यक्रम रद्द केले. श्रेयसचा जन्म २६ जुलै २०१० रोजी झाला होता. तो बंगळुरूमधील केन्सारी शाळेचा विद्यार्थी बाइक रेसिंगच्या जगात एक उगवता तारा होता. त्याने राष्ट्रीय स्तरावर अनेक शर्यती जिंकल्या होत्या.

# पॅट कमिन्स भारत दौऱ्यातून बाहेर होण्याची शक्यता

**सिडनी : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्स हा मनगटाचे हाड फ्रॅक्चर असताना इंग्लंडविरुद्ध अ‍ॅशेस मालिकेतील पाचवा कसोटी सामना खेळल्याचे वृत्त आहे. यामुळे पुढील महिन्यात आयोजित भारत दौऱ्यात तीन सामन्यांच्या वनडे मालिकेस तो मुकण्याची शक्यता आहे.

क्रिकेट ऑस्ट्रेलियाने कमिन्सच्या दुखापतीची अधिकृत माहिती दिलेली नाही. कमिन्सला दक्षिण आफ्रिका आणि भारत दौऱ्यात संघाचे नेतृत्व करायचे आहे. 'सिडनी मॉर्निंग हेरॉल्ड'च्या वृत्तानुसार वैद्यकीय पथकाने फ्रॅक्चरची शक्यता नाकारलेली नाही. मागच्या आठवड्यात ओव्हल कसोटीच्या पहिल्या दिवशी या वेगवान गोलंदाजाच्या मनगटाला दुखापत झाली. मनगटावर पट्टी बांधून त्याने कसोटी खेळणे सुरूच ठेवले.

# अ भी ष्ट चिं त न

























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com